७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक **संध्या**

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

रविवार, दि. २१ जून २०२६

www.dainikesandhya.com | www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १७६ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रुपये


# ‘श्री अंबाबाई मंदिर परिसर व कॉरिडॉर’ साठी १५०० कोटींचा निधी

**केंद्रीय मंत्री अमित शाह**



**कोल्हापूर (दै. संध्या)**

दक्षिण भारताची काशी म्हणून ओळखले जाणारे करवीर निवासिनी श्री अंबाबाई (महालक्ष्मी) मंदिर तब्बल १५०० कोटी रुपयांचा निधी खर्च करून हा परिसर विकास कॉरीडॉर म्हणून विकसित करण्यात येणार आहे, ही बाब सर्व भाविकांसाठी अत्यंत अभिमानास्पद असल्याचे प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केले.

पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर आयोजित कृतज्ञता सोहळा सभेत ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री तथा पालकमंत्री प्रकाश आबिटकर, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील, सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह भोसले, नगर विकास राज्यमंत्री तथा कोल्हापूरच्या सहपालकमंत्री माधुरी मिसाळ, राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षीरसागर, माजी मंत्री रवींद्र चव्हाण खासदार सर्वश्री धनंजय महाडिक, धैर्यशील माने, आमदार सर्वश्री डॉ. विनय कोरे, डॉ.राजेंद्र पाटील-यड्रावकर, अमल महाडिक, चंद्रदीप नरके, डॉ.अशोकराव माने, शिवाजी पाटील, निरंजन डावखरे, जिल्हा परिषद अध्यक्ष शिल्पा खोत,महापौर रुपाराणी निकम, माजी आमदार प्रकाश आवाडे आदी मान्यवर उपस्थित होते.

केंद्रीय मंत्री श्री. शाह म्हणाले, ७ व्या शतकातील असलेल्या या प्राचीन मंदिराच्या परिसरातील सुमारे ४१ छोट्या-मोठ्या मंदिराचे संरक्षण करून येथील परिसर पुढील ६ महिन्याच्या आत विकसित करण्यात येणार आहे. या ठिकाणी अन्नछत्र सुरू करण्याबाबत आपण सकारात्मक असल्याचे सांगितले. आपल्या वारशाचे, संस्कृतीचे जतन, संवर्धन करणे आणि त्याला चालना देणारे हे शासन असल्याचे स्पष्ट केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कारकींदीत आर्थिक, संरक्षण, सुरक्षा या सर्वच क्षेत्रात झालेल्या प्रगतीची मांडणी करताना देशातील घुसखोरांना अत्यंत बारकाईने शोधून काढण्यात येईल असा इशारा त्यांनी दिला. तसेच देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात ग्रामीण व शहरी भागातील विकास गतीने सुरू असल्याचेही श्री शाह म्हणाले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देशाची अध्यात्मिक व सांस्कृतिक शक्ती पुनर्जीवित होत आहे. या परिसराचा विकास करण्याचा केंद्रीय गृहमंत्र्यांनी आग्रह धरला होता. राज्यातील ५ जोतिर्लिंगांसह कोल्हापूर जिल्ह्यातील जोतिबा तीर्थक्षेत्राचाही विकास सुरु आहे. भाविकांसाठी या आराखड्यातून पुढील शंभर वर्षात सेवा करता येईल, असे व्यापक काम राज्य शासनाने हाती घेतले आहे. कोल्हापूर शहर हे केवळ शक्तिपीठ अथवा अध्यात्माची पंढरी नाही तर ती सहकाराची आद्य पंढरी असल्याचे सांगितले.केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या कणखर नेतृत्वात देशाची वेगळी ओळख निर्माण झाली असून त्यांनी सहकार क्षेत्रात अतुलनीय कार्य केल्याचे गौरोवोद्गार मुख्यमंत्र्यांनी काढले. तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, येथील मंदिर परिसरातील आधुनिकीकरण व सुशोभीकरणाच्या कामाला आज प्रारंभ झाला आहे. हे काम पूर्ण झाल्यानंतर कोल्हापूर एक वेगळ्या उंचीवर जाईल.

महाराष्ट्राने संपूर्ण देशाला अध्यात्मिक व सांस्कृतिक क्षेत्रात वेगळी ओळख दिली आहे.अमित शाह हे अतिशय कणखर गृहमंत्री असून देशातील नक्षलवाद संपवण्याचे काम केंद्रीय गृहमंत्रालयाद्वारे पूर्ण झाले. त्याचबरोबर सहकार क्षेत्रात अनेक लोकाभिमुख बदल श्री. शाह यांनी घडविले आहेत.

पालकमंत्री श्री. अबिटकर म्हणाले, तीर्थक्षेत्र विकास आराखडा हा कोल्हापूरवासियांसाठी अत्यंत अभिमानाचा व आनंदाचा क्षण आहे. तीर्थक्षेत्र विकास आराखड्यांतर्गत या ठिकाणी भाविकांना सुविधा निर्माण होतील. राज्यातील इतर सुविधांना ही केंद्र शासनाने गती देवून महाराष्ट्राचा विकास करावा अशी अपेक्षा याप्रसंगी व्यक्त केली.



## केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सपत्नीक घेतले श्री अंबाबाई महालक्ष्मीचे दर्शन

**कोल्हापूर (दै. संध्या)**

**■ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही घेतले दर्शन**

देशभरातील भाविकांचे श्रद्धास्थान असणाऱ्या कोल्हापूरच्या श्री अंबाबाई महालक्ष्मी शक्तिपीठाला आज केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी कुटुंबासह दर्शनासाठी उपस्थिती लावली. मंदिराच्या कामाच्या शुभारंभ कोनशिलेचे उद्‌घाटन करण्यापूर्वी त्यांनी पत्नी सोनल शाह यांच्यासोबत श्री अंबाबाई महालक्ष्मीचे दर्शन घेतले. दक्षिण भारतातील महत्त्वपूर्ण देवस्थान असणाऱ्या व साडेतीन शक्तिपीठांपैकी एक शक्तिपीठ म्हणून श्रध्देय असणाऱ्या या मंदिराप्रति केंद्रीय मंत्री अमित शाह यांची श्रद्धा सर्वश्रुत आहे. आज मंदिरात आगमन झाल्यानंतर त्यांनी मंदिर परिसरात सुरु असलेल्या विकास कामांकडे लक्ष देत नव्याने बसवण्यात आलेल्या सुवर्णकलशाकडे देखील लक्ष वेधले.

मंदिराच्या दुरुस्ती व सुशोभीकरणाची माहिती त्यांनी घेतली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सार्वजनिक आरोग्यमंत्री तथा कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर, उच्च व तंत्रशिक्षण चंद्रकांत (दादा) पाटील, मंत्री आशिष शेलार, अन्य मंत्री महोदय उपस्थित होते.

## विधानमंडळ पावसाळी अधिवेशनासाठी छापील पास बंद!

**मुंबई (दै. संध्या)**



महाराष्ट्र विधानमंडळाचे पावसाळी अधिवेशन सोमवार, २२ जून, २०२६ पासून विधान भवन, मुंबई येथे सुरू होणार असून यावेळी विधान भवन प्रवेशासाठी प्रथमच एकही प्रवेश पत्रिका छापण्यात येणार नसून पीठासीन अधिकारी, मुख्यमंत्री ते अधिकारी-कर्मचारी वर्ग, स्वीय सहायक, अभ्यागत अशा सर्वांसाठी विधान भवन ई-प्रवेश प्रणालीद्वारे ‘चेहरा पडताळणी पध्दती’ अवलंबिण्यात येत आहे, अशी माहिती महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातर्फे देण्यात आली. विधानपरिषदेचे माननीय सभापती प्रा.राम शिंदे आणि विधानसभेचे माननीय अध्यक्ष ॲड. श्री.राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत हा निर्णय घेण्यात आला असून त्याची अत्यंत काटेकोर स्वरूपात अंमलबजावणी करण्यात येणार आहे. अधिवेशनकाळात विधान भवन परिसरामध्ये होणारी गर्दी नियंत्रित असावी तसेच सुरक्षा यंत्रणेला तपासणी संदर्भात सुलभता असावी या दृष्टीने या पावसाळी अधिवेशनात छापील प्रवेशपत्राऐवजी ‘चेहरा पडताळणी पध्दती’ राबविण्यात येत असून याबाबत मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री, मंत्री, राज्यमंत्री तसेच अन्य सर्व संबंधित आस्थापना, वार्तांकनासाठी येणारे इलेक्ट्रॉनिक आणि प्रिंट माध्यमांचे प्रतिनिधी, भा.प्र.से. तसेच भा.पो.से. आणि अन्य सर्व अधिकारी कर्मचारी, सचिव-विशेष कार्य अधिकारी, सर्व स्वीय सहायक अशा सर्वांना यासंदर्भात विधानमंडळ सचिवालयातर्फे सूचित करण्यात आले आहे. ई-ऑफिस प्रणालीद्वारे ऑनलाईन स्वरूपात माहिती पाठविणे, आवश्यक ती माहिती ई-मेलवर प्राप्त करून घेण्याची कार्यवाही सुरू झाली असून ती दिनांक २० व २१ जून, २०२६ रोजी सुटीच्या दिवशीही सुरू राहणार आहे. यासंदर्भातील सविस्तर परिपत्रक महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाने जारी केले आहे. सर्वांनी या नव्या प्रवेशपास प्रणालीचा स्वीकार करावा आणि सुरक्षा यंत्रणेला सहकार्य करावे असे आवाहनही विधानमंडळ सचिवालयातर्फे करण्यात आले आहे.

## महाराष्ट्र राज्य नावीन्यता सोसायटी व उदैती फाउंडेशन यांच्यात सामंजस्य करार

### महिला उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी महिला स्टार्टअप हब स्थापन करणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई (दै. संध्या)**



कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागांतर्गत महाराष्ट्र राज्य नावीन्यता सोसायटी आणि उदैती फाउंडेशन यांच्यात याबाबत सामंजस्य करार करण्यात आला आहे. यातून महिला उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्रात ‘महिला उद्योजकता स्टार्ट अप’ हब स्थापन होण्यास मदत होणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, या कराराअंतर्गत महाराष्ट्र राज्य नावीन्यता सोसायटी आणि उदैती फाउंडेशन तांत्रिक व ज्ञान भागीदार म्हणून कार्य करणार आहे. महिलांना उद्योजकांना वित्तपुरवठा, बाजारपेठ व व्यवसाय सहाय्यदेखील मिळवून देण्यात येणार आहे. महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी यामुळे चालना मिळणार असून महिला उद्योजकांच्यादृष्टीने उत्साही वातावरण तयार होण्यास मदत होईल.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या नेतृत्वाखाली हा सामंजस्य करार झाला आहे. महाराष्ट्र राज्य नावीन्यता सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. श्रीकांत पाटील आणि उदैती फाउंडेशनच्या संस्थापक मुख्य कार्यकारी अधिकारी पूजा शर्मा गोयल यांनी या करारावर स्वाक्षरी केली. महिला उद्योजकता स्टार्ट अप हब राज्यातील स्टार्ट अप परिसंस्थेमध्ये समन्वय साधणारे व्यासपीठ म्हणून काम करेल. शासनाच्या विविध विभाग, परिसंस्था भागीदार आणि सहाय्यक संस्थांना एकत्र आणून महिला उद्योजकांसाठी संधींचे मार्ग अधिक सक्षम करण्याचे काम या हबद्वारे केले जाईल. महाराष्ट्रातील महिला-नेतृत्वाखालील उद्योगांसाठी ‘ॲक्सेलरेटर मॉडेल’ तयार करून त्याची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. या ॲक्सेलरेटरच्या माध्यमातून मार्गदर्शन, उद्योग क्षेत्राची गरज, वित्तपुरवठ्याची उपलब्धता, बाजारपेठीय दुवे, राज्य व केंद्र शासनाच्या विविध योजनांशी समन्वय साधून उदैती फाउंडेशन महाराष्ट्र राज्य नावीन्यता सोसायटीला तांत्रिक सहाय्यही देणार आहे.

राज्यासाठी महिला स्टार्ट अप निर्देशांक विकसित करून त्याचे संस्थात्मकीकरण करण्यावरदेखील भर दिला जाणार आहे. निर्देशांकाच्या माध्यमातून महिला उद्योजकतेच्या प्रगतीचा आढावा विविध विभाग व जिल्हानिहाय लिंग-विभागित आकडेवारीच्या आधारे घेता येईल. या उपक्रमामुळे पुराव्यावर आधारित धोरणनिर्मिती अधिक बळकट होईल, विभागांमधील समन्वय अधिक सुलभ होईल. शासनाचे विविध विभाग व जिल्ह्यांतील कामगिरीचे निरीक्षण करण्यासाठी ‘गव्हर्नन्स डॅशबोर्ड’ विकसित करण्यात येणार आहे, ज्यामुळे वेळोवेळी आढावा घेऊन आकडेवारीवर आधारित निर्णयप्रक्रिया सुलभ होईल; तसेच ‘वुई इंडेक्स’च्या अंमलबजावणीस मार्गदर्शन करण्यासाठी आणि शासनातील विविध संस्थांमधील समन्वय मजबूत करण्यासाठी आंतरविभागीय संचालन समिती स्थापन करण्यासही या भागीदारीतून मदत होणार आहे. उदैती फाउंडेशन भारतातील महिलांच्या उद्योग क्षेत्रात सहभागाला गती देण्यासाठी कार्यरत आहे. राज्य शासन आणि खासगी क्षेत्रातील उद्योगांसोबत सहकार्य करत १५६ दशलक्ष रोजगारक्षम; परंतु सध्या बेरोजगार असलेल्या महिलांना रोजगाराच्या प्रवाहात आणण्याचे उद्दिष्ट या संस्थेचे आहे. महिलांना रोजगार मिळविण्यात येणारे अडथळे दूर करणे, महिला उद्योजकांना रोजगार देणारे बनण्यासाठी उद्योजकता परिसंस्था मजबूत करणे यावर भर देण्यात येणार आहे. निवास आणि बालसंगोपन यांसारख्या महत्त्वाच्या सुविधांना बळकटी दिली जाणार आहे. यातून ‘विकसित भारत २०४७’ या राष्ट्रीय दृष्टिकोनाला गती देण्यास हातभार लाभेल.


क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा

SUBSCRIBE

www.sandhyaepaper.com



**ढिंग-टांग**




**NEET परीक्षेच्या पार्श्वभूमीवर BEST प्रशासनाचा महत्त्वाचा निर्णय**

# संप कर्मचाऱ्यांना MESMA ची नोटीस

**मुंबई (दै. संध्या)**



राजधानी मुंबईत बेस्ट कर्मचाऱ्यांनी संप पुकारल्याने सर्वसामान्य प्रवाशांचे मोठे हाल होत असून बाहेरुन आलेल्या पर्यटकांनाही या संपाचा फटका बसत आहे. याशिवाय, उद्या होणाऱ्या नीट परीक्षेच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांनाही मुंबईतील बेस्ट बसच्या संपाची मोठी अडचण ठरू शकते, त्याच पार्श्वभूमीवर बेस्ट प्रशासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. बेस्ट संयुक्त कामगार कृती समितीच्या संपाच्या पार्श्वभूमीवर बेस्ट प्रशासनाकडून प्रवाशांना होणारी गैरसोय टाळण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. संपात सहभागी झालेल्या कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा देखभाल कायदा अंतर्गत नोटीस बजावण्यात आली असून वेट लीज कंत्राटदारांनाही MESMA अंतर्गत नोटीस देण्यात आल्याची माहिती बेस्ट प्रशासनाने दिली आहे. प्रवाशांची गैरसोय होऊ नये यासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाला 100 बसेस उपलब्ध करून देण्यास सांगण्यात आले आहे. तसेच, मुंबईतील 63 NEET परीक्षा केंद्रांवर जाणाऱ्या विद्यार्थ्यांना अडचण येऊ नये यासाठी अतिरिक्त 60 बसेसची व्यवस्था करण्यात आली आहे. या बसेस सकाळी 9 ते दुपारी 1 आणि संध्याकाळी 5 ते 7 या वेळेत चालवण्याचे आदेश डेपो व्यवस्थापकांना देण्यात आले आहेत. दरम्यान, बेस्टच्या वीज विभागावर या संपाचा कोणताही परिणाम झालेला नसून अत्यावश्यक वीज सेवा सुरळीत सुरू असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

प्रवाशांना सुरक्षित, अखंड आणि विश्वासार्ह सेवा देणे हे प्रशासनाचे सर्वोच्च प्राधान्य असून संपाचा परिणाम कमी करण्यासाठी सर्व आवश्यक उपाययोजना राबवल्या जात असल्याचे बेस्ट प्रशासनाने प्रसिद्धी पत्रकातून सांगितले आहे. MESMA म्हणजेच, (Maharashtra Essential Services Maintenance Act) या कायद्याअंतर्गत अत्यावश्यक सेवा (जसे की वाहतूक, वीज, पाणी इ.) सुरळीत ठेवण्यासाठी सरकारला संप किंवा काम बंद आंदोलनावर काही निर्बंध घालण्याचे अधिकार मिळतात. या कायद्यानुसार संपात सहभागी होणाऱ्या कर्मचाऱ्यांना नोटीस, कारवाई किंवा कायदेशीर दंडाची प्रक्रिया होऊ शकते. दरम्यान, आता बेस्टच्या प्रकरणात प्रशासनाने संप करणाऱ्या कर्मचाऱ्यांना MESMA अंतर्गत नोटीस बजावल्याचे सांगितले आहे.

बेस्ट कर्मचाऱ्यांच्या मागण्यांसाठी बेस्ट कृती समितीकडून संपाची हाक देण्यात आली आहे. त्यामुळे मुंबईची जीवनवाहिनीवर त्याचा परिणाम होणार असून या बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र आहे. तर 2766 पैकी केवळ 32 बस रस्त्यावर धावताना दिसत आहे.

## मुंबईसह संपूर्ण कोकणात पावसासाठी अनुकूल वातावरण, कधीपासून सुरु होणार पाऊस?

**मुंबई (दै. संध्या)**



सध्या राज्यात सर्वचजण पावसाची वाट पाहत आहेत. यावर्षी पावसानं चांगलीच ओढ दिल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. त्यामुळं शेतकरी देखील संकटात सापडला आहे. अशातच मान्सूनबाबात एक मोठी आणि दिलासादायक बातमी समोर आली आहे. मुंबईत मान्सूनच्या आगमनाची शक्यता आहे. 23 जूनपासुन मुंबईसह संपूर्ण कोकणात पावसासाठी अनुकूल वातावरण निर्मिती होणार असल्याची माहिती ज्येष्ठ हवामान अभ्यासक माणिकराव खुळे यांनी दिली आहे.

मंगळवार दिनांक 23 जूनपासुन मुंबईसह संपूर्ण कोकणात पावसासाठी अनुकूल वातावरण निर्मितीची शक्यता असुन तिथे सध्या पूर्वमोसमी पावसाची शक्यता जाणवते. वेंगुर्ला देवगड हर्णाई या मान्सून पोहोचलेल्या ठिकाणी मान्सूनच्या सरींना चालना मिळू शकते अशी माहिती माणिकराव खुळे यांनी दिली.

हवामान अभ्यासक के एस होसाळीकर यांनी देखील मान्सूनबाबत महत्वाची माहिती दिली आहे. 22 ते 23 जूनपासून दक्षिण कोकण आणि महाराष्ट्रा लगतच्या भागात मान्सून पुन्हा सक्रिय होण्याची शक्यता आहे. पावसाचा जोर हळूहळू वाढून 24 ते 26 जून दरम्यान, तो उत्तर कोकण आणि महाराष्ट्राच्या अंतर्गत भागापर्यंत तपोहोचू शकतो. हवामानाच्या मॉडेल्सनुसार, आगामी दिवसात राज्यातील बहुतांश भागात पाऊस पडण्याची शक्यता आहे. हा पाऊस जूनच्या अखेरपर्यंत राहू शकतो. मागील 2019 व 2023 अशा एल-निनोच्या गत दोन वर्षात, मुंबईत मान्सूनचे 25 जून ला म्हणजे त्याच्या सरासरी 11 जून ह्या तारखेपासून तब्बल 14 दिवसांनी उशिरा आगमन झाले होते. यावर्षीही एल-निनोचे वर्ष आहे, आणि अद्याप मुंबईत मान्सून पोहोचला नाही. 2026 च्या एल- निनो वर्षात सुद्धा मान्सूनचे गुरुवार दिनांक 25 जून ला मुंबईत आगमनाची शक्यता निर्माण झाली असल्याचे माणिकराव खुळे म्हणाले.

गुरुवार दिनांक 25 जून ते बुधवार दिनांक 1 जुलै दरम्यानच्या जुनच्या शेवटच्या आठवड्यात मुंबईसह संपूर्ण कोकणात जोरदार मान्सूनची शक्यता ही कायम आहे. मुंबईतील दिवसाच्या दमट व रात्रीच्या उकाड्यापासुन मुंबईकरांना दिलासा कधीपासून मिळू शकतो. आज शनिवार दिनांक 20 जून पासूनच वातावरण बदलास सुरवात झाली असुन, मुंबईकरांना दिवसाच्या दमटपणा व रात्रीच्या उकाड्यापासुन काहीसा दिलासा मिळू शकतो, असे वाटते.

मुंबईतील मान्सूनच्या आगमनानंतर म्हणजे जुनच्या शेवटच्या आठवड्यात खान्देश, नाशिक अहमदनगर, पुणे सातारा कोल्हापूर व पश्चिम मराठवाड्यातील जिल्ह्यात मान्सून च्या पावसाची शक्यता जाणवते. पूर्व मराठवाडा व विदर्भात मात्र जुलै पहिल्या व दुसऱ्या आठवड्यात मान्सून च्या पावसाची शक्यता जाणवते.

> एल निनो चे वर्ष व आजपर्यंत कोकणात 81 टक्के कमी झालेला पाऊस असे जरी असले तरी मान्सून च्या उर्वरित 130 दिवसाच्या कालावधीतुन म्हणजे आजपासुन साधारण 20 ऑक्टोबर पर्यंत मुंबईसह कोकणात मान्सून च्या पावसातुन मुंबईतील तळी व धरणांचे असलेले जाळे ह्यातून मुंबईकरांची वर्षभराची पिण्याच्या पाण्याची समस्या मिटू शकते, अशी माहिती माणिकराव खुळे यांनी दिली.

## संपादकीय

# माधुरी हत्तिणीच्या परतीच्या प्रवासाचा अनोखा 'लोकलढा'

कोल्हापूरच्या मातीतच लढण्याची रग आहे. लढून परिस्थिती बदलणार आहे का, असा विचार कोल्हापुरी माणूस करत नाही. तो लढतो आणि यश मिळवून दाखवतो. नांदणी (ता.शिरोळ) येथील परमपूज्य स्वस्तिश्री जिनसेन भट्टारक पट्टाचार्य संस्थान मठातील महादेवी ऊर्फ माधुरी हत्तिणीला 'वनतारा'तून परत आणण्याच्या लढ्याबाबतही तेच घडले. नांदणी जैन मठ हे महाराष्ट्र आणि कर्नाटक सीमाभागातील दिगंबर जैन समाजाचे एक अत्यंत प्राचीन आणि सर्वोच्च धार्मिक आद्यपीठ आहे. या मठाला १,३०० वर्षांपेक्षा जास्त जुना ऐतिहासिक आणि आध्यात्मिक वारसा आहे. जैन धर्मीयांच्या ७४० पेक्षा अधिक गावांचा आणि मंदिरांचा कार्यभार या मठाच्या मार्गदर्शनाखाली चालतो. माधुरी हत्तीण सहा वर्षांची असताना या मठात आणण्यात आली आणि मठाच्या सर्व धार्मिक परंपरांची तसेच मठाच्या वैभवाची ती प्रतीक बनली. गुजरातमधील 'वनतारा' प्रकल्पाला हत्तींची गरज भासू लागल्यावर माधुरी हत्तिणीचा वाद साधारणत: २०१६ मध्ये सुरू झाला. सर्वधर्मींच्या सण-उत्सवांमध्ये ती सहभागी होत असे. हैदराबादमध्ये एका मिरवणुकीत सहभागी झाल्यावर तिचे हाल झाल्याचे व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आणि त्यातून तिला 'वनतारा'मध्ये नेण्याच्या प्रक्रियेने जोर धरला. त्याविरोधात गतवर्षी जूनमध्ये कोल्हापूर जिल्ह्यात हत्तिणीला नेण्यास विरोध करणारे जैन बांधवांचे मोठे आंदोलन झाले; परंतु उच्च व सर्वोच्च न्यायालय आणि उच्चाधिकार समितीच्या आदेशानुसार २८ जुलै २०२५ला ही हत्तीण 'वनतारा'कडे सुपुर्द करण्यात आली.

या हत्तिणीला नांदणीतून नेताना लेक सासरी जाताना जसे आई-बाप धाय मोकलून रडतात, तसा सारा समाज रडला. कारण ही हत्तीण तब्बल ३३ वर्षांच्या सहवासाने त्यांच्या कुटुंबाची सदस्य बनली होती. हे भावनिक बंध पाहून माधुरीला नांदणी मठात परत आणण्याची लढाई सुरू झाली. त्यासाठी माजी खासदार राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली नांदणी-कोल्हापूर ही ४५ किलोमीटरची मूकयात्रा निघाली. सह्यांची मोहीम सुरू झाली. केंद्र व राज्य सरकारमधील सत्ताधारी नेत्यांबद्दल रोष व्यक्त झाला. त्यानंतर 'वनतारा'ने या प्रकरणातून माघार घेतली आणि हत्तीण परत नांदणी मठालाच परत करण्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला. त्यानुसार आता ही हत्तीण तिचे माहेर असलेल्या नांदणी मठात लवकरच पुन्हा दाखल होत आहे. माधुरीच्या स्वागतासाठी मठाच्या सहा एकर जागेत माधुरीवाडा बांधण्याचे काम सुरू झाले आहे. 'वनतारा'नेच त्यासाठी १४ कोटी रुपये उपलब्ध करून दिले आहेत. या हत्तिणीचे वय ३८ वर्षे आहे. तिच्या सहजीवनासाठी आणखी दोन हत्ती तिथे आणण्यात येणार आहेत. त्यांच्या आरोग्यासाठी प्रगत तंत्रज्ञान वापरण्यात येणार आहे. हायड्रोथेरपी, मसाज सेंटर, फिरण्यासाठी वाळूचा ट्रॅक, शॉवर, कूलरची व्यवस्था करण्यात येत आहे. दोन्ही बाजूंनी संरक्षक जाळी बांधण्यात येत आहे. माधुरीवाडा हा कोल्हापूर जिल्ह्यातील पर्यटनामध्ये आता नवी भर टाकू शकेल. एक बलाढ्य उद्योगसमूह, पेटापासून विविध न्यायालये आणि दोन्ही सरकारे एका बाजूला असतानाही माधुरी हत्तीण परत नांदणी मठात येते ही लोकआंदोलनाची ताकद आहे. जैन समाजात मठांचे महत्त्व जास्त आहे. महादेवी हत्तिणीच्या प्रकरणात जैन समाज दुखावला गेला होता. राज्यकर्त्यांनाही हे परवडणारे नव्हते. एक हत्तीण परत गेली तर बिघडत नाही; परंतु समाज दुखावता कामा नये असाही विचार ही हत्तीण परत देताना झाला आहे. महादेवी हत्तिणीच्या परतीच्या प्रवासाचे असे अनेक पदर आहेत; परंतु त्यातून एक चांगले घडत आहे की महाराष्ट्रातील हत्तींसाठीचे अत्याधुनिक केंद्र नांदणीत होत आहे. एका लोकलढ्याला यश येते आहे.

## संस्कृत सुभाषित

यो वर्तते शचित्वेन स वैश्वानर उच्यते।
यो वर्ततेऽशुचित्वेन स वै श्वा नर उच्यते।।
जो अंतर्बाह्य शुद्ध आहे, त्याला वैश्वानर (अग्नी) असे म्हणतात, जो अंतर्बाह्य अशुद्ध आहे, त्याला लोक श्वान (कुत्रा) म्हणतात. (वैश्वानर अग्नी, श्वान कुत्रा.)

## गुरु वचन

### अशुभ झाले शुभ

सद्पुरुषचे लक्षण काय? संसारासासाठी निरर्थक असलेल्या वस्तुंनी तो व्यक्ती संतुष्ट आहे. गल्लीतल्या कपड्याच्या तुकड्याने ज्याने शाल बनवली आहे, त्याचे मन, पाप-पुण्यापेक्षा मोठे आहे. असा योगी कधी बालकाप्रमाणे खेळतो तर कधी वेडा होतो. त्यास खेळताना पाहून तो वेडा झाला असे समजू नका. वेड्यासारखे समजा, बालकाप्रमाणे माना. त्याच्या शरीराला कमीत कमी वस्तूंची गरज आहे व त्यावर संतुष्ट आहे. आपण जितक्या जास्त वस्तूंवर अवलंबून आहोत, तितके जास्त दु:खी आहोत.

५० वर्षापूर्वी स्वयंपाक घर आजच्या इतकी संपन्न नव्हते. आज आपल्याकडे मिक्सर, गिझर, कुलर, कुकर, मायक्रोवेव्ह अवन आहे. वेळ सुद्धा आहे पण त्या वेळेची तरतूद कुठे होत आहे. जितके जास्त आपण वस्तुंवर अवलंबून राहू, तितके आपले दु:ख वाढते. जर अमेरिकेत कोक बंद झाले तर लोक तो धक्का कसे सहन करतील. जर भारतात चहावर बंदी लावण्यात आली तर काय होईल!

शब्द -विषय अर्थात् यरू विश इति। जे विष आहे, ते नियंत्रित केले पाहिजे. तुम्ही एखादे औषध घेता तेव्हा त्यावर लिहिले असते की 'पॉयझन' म्हणजे काय? जर याचा दुरुपयोग केला म्हणजे जास्त मात्रात घेतले तर तुम्ही दगावू शकतात. ज्या माणसाच्या गरजा कमी आहेत, ज्याचे शरीर योगात आहे, तो यामुळे जास्त प्रभावित होणार नाही. तो पाप-पुण्य, शुभ-अशुभ विचारातून मुक्त आहे. आपल्या डोक्यात शुभ-अशुभ फिट झाले आहे. दक्षिण भारतात डोक्यावर पदर घेणे अशुभ मानले जाते, उत्तर भारतात डोक्यावर पदर घेणे शुभ मानले जाते. पंजाबमध्ये उडीद दाळ शुभ प्रसंगी खाल्ली जाते व उत्तर प्रदेशात उडीद दाळ मृत्यू प्रसंगी खाल्ली जाते. उडीद दाळ एका ठिकाणी शुभ तर इतर ठिकाणी अशुभ आहे. एका ठिकाणी डोक्यावर पदर घेणे शुभ आहे तर दुसऱ्या ठिकाणी अशुभ.

५० वर्षापूर्वी मुलींचे नोकरी करणे अशुभ होते, ते आज शुभ झाले. विदुर नीतित दूध विकणे आई विकण्यासारखे आहे. काळ बदलला. दुध विकणे वाईट पण विना नफा-तोटा तत्वावर विकणे योग्य आहे. काळ आणखी बदलला. दूध विकणे योग्य आहे त्यात थोडा नफा झाला तर चालते पण कमीत कमी पाणी टाकून विकावे. आज तर दुध विकणे, नफा कमावणे, पाणी टाकणे सुद्धा योग्य पण स्वच्छ पाणी टाकून तरी विका.

काही काळापूर्वी जी गोष्ट शुभ होती ती आज अशुभ होऊ शकते. काही काळापूर्वी जे अशुभ होते ते आज शुभ असू शकते. पाप-पुण्याच्या फेऱ्यातून संत वर आले आहेत. गीतेत वारंवार येते की, दोन्ही सैन्यांमध्ये कौरव नकारात्मक, पांडव सकारात्मक दिसतात. ज्ञानी चांगल्या-वाईटातून वर येतो. असा माणूस संसारात बालकाप्रमाणे आहे.

मुलांना येणाऱ्या काळाची चिंता किंवा गतकाळाचे दु:ख नाही. ज्ञानी व्यक्ती मुलाप्रमाणे आहे. मुलं नेहमी वर्तमानात राहतात. शंकराचार्य म्हणतात की, ज्ञानी व्यक्ती वेड्याप्रमाणे असतो. तो ज्या पातळीवर आहे, ते आपणास समजू शकत नाही. त्याच्यासाठी कुणी आपले किंवा त्रयस्त नाही. ज्या शरीराच्या गरजा कमी आहेत, जे पाप-पुण्यापेक्षा वर आहेत, ते लोक वेड्याप्रमाणे आहेत, ते बालकाप्रमाणे आहेत.

## पंचांग

पंचांग
२१ जून २०२६
रविवार
विक्रम संवत्- २०८२
निज ज्येष्ठ शके
संवत्- १९४८
संवत्सर - पराभवनाम
अयन- उत्तरायणारंभ
मास- निज ज्येष्ठ
ऋतु- सौर ग्रीष्म
शुक्ल पक्ष
तिथि:सप्तमी १५:२०:५५
नक्षत्र:पूर्वाफाल्गुनी ०९:३१:०६
योग:सिद्ध ११:२०:५१
करण:वणिज १५:२०:५५
करण:विष्टि २७:२५:०९+
सूर्य:मिथुन
चन्द्र:कन्या१५:३९:४२
हिजरी सन् - १४४८
मुस्लिम मास - मोहरम
तारीख - ५
विशेष
भानुसप्तमी
आंतराष्ट्रीय योग दिन
झाशीची रानी लक्ष्मीबाई पुण्यतिथी (तिथीप्रमाणे)
दक्षिणयनारंभ
कोलबास्वामी जयंती व पुण्यतिथी - धापेवाडा (नागपूर)

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ९८७

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | 2 | 4 | 5 | |
| | | | 7 | | 6 | 3 | | 1 |
| | 3 | | 8 | 5 | | | | 2 |
| 3 | | | | 1 | | 2 | | |
| 7 | | | 9 | 2 | 5 | | | 3 |
| | | 2 | | 4 | | | | 5 |
| 2 | | | | 8 | 1 | | 7 | |
| 5 | | 1 | 2 | | 9 | | | |
| | 6 | 4 | 5 | | | | | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

- उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ९८६ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | 6 | 8 | 3 | 1 | 5 | 9 | 2 | 7 |
| 1 | 5 | 9 | 2 | 7 | 8 | 3 | 6 | 4 |
| 3 | 7 | 2 | 9 | 6 | 4 | 5 | 1 | 8 |
| 7 | 9 | 1 | 6 | 2 | 3 | 4 | 8 | 5 |
| 6 | 2 | 4 | 5 | 8 | 9 | 7 | 3 | 1 |
| 5 | 8 | 3 | 1 | 4 | 7 | 2 | 9 | 6 |
| 9 | 3 | 7 | 8 | 5 | 1 | 6 | 4 | 2 |
| 8 | 4 | 6 | 7 | 9 | 2 | 1 | 5 | 3 |
| 2 | 1 | 5 | 4 | 3 | 6 | 8 | 7 | 9 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १७४९ – कॅनडाच्या नोव्हा स्कॉशिया प्रांतात हॅलिफॅक्स शहराची स्थापना.
- १७८८ – न्यू हॅम्पशायर अमेरिकेचे नववे राज्य झाले.
- १८९८ – गुआम अमेरिकेचा प्रांत झाला.
- १९४० – दुसरे महायुद्ध – फ्रांसने जर्मनीसमोर शरणागती पत्करली.
- १९४२ – दुसरे महायुद्ध – जर्मन सैन्याने टोब्रुक जिंकले.

### राष्ट्रीय

- १६७४ – श्री शिवराज भूषण या काव्याचे लेखन कवी भूषण यांनी पूर्ण केले.
- १९३४ – पुणे येथे महात्मा गांधी यांच्या हस्ते हिंदी प्रचार संघ या संस्थेची स्थापना.
- १९९१ – भारताच्या पंतप्रधानपदी पी.व्ही. नरसिंह राव.
- २००६ – गोव्यात इयत्ता पहिलीपासून इंग्रजी विषय अनिवार्य करण्यात आले.

### जन्म

- १००२ – पोप लिओ नववा याचा जन्म.
- १२२६ – बोलेस्लॉस पाचवा, पोलंडचा राजाचा जन्म.
- १७३२ – योहान क्रिस्चियन बाख, जर्मन संगीतकारचा जन्म.
- १७८१ – सिमिओन-डेनिस पॉइसॉन, फ्रेंच गणितज्ञ व भौतिकशास्त्रज्ञाचा जन्म.
- १९०५ – ज्याँ-पॉल सार्त्र, फ्रेंच लेखक व तत्त्वज्ञानीचा जन्म.
- १९२३ – सदानंद रेगे, मराठी कवी, कथाकार आणि अनुवादकचा जन्म.

### निधन

- १३०५ – वेंकेस्लॉस दुसरा, पोलंडचा राजाचे निधन.
- १३७७ – एडवर्ड तिसरा, इंग्लंडचा राजाचे निधन.
- १५२७ – निकोलो माकियाव्हेली, इटलीचा राजकारणी, इतिहासकारचे निधन.

## : SMS :

Larki waly: Humain aisa larka chahiye, Jo Kuch Khata peeta na ho, Aur Kuch Ghalat kaam na karta ho, Pandit: Aisa Larka to aapko ICU k Emergency Ward main he milega.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३६.४ | ३० |
| अहमदनगर | ३५.४ | २६.८ |
| अकोला | ४१.२ | ३२.८ |
| अमरावती | ४०.८ | ३३.७ |
| बीड | ४४.२ | ३७.३ |
| भंडारा | ४३ | ३५.९ |
| बुलढाणा | ४२.३ | ३४.९ |
| चंद्रपूर | ४४.२ | ३७.९ |
| चेन्नई | ४२.९ | ३६.३ |
| नवी दिल्ली | ४२ | ३५.८ |
| धुळे | ३९.८ | ३१.६ |
| गोंदिया | ४२.२ | ३४.७ |
| जळगाव | ४१.४ | ३२.५ |
| कोल्हापूर | ३३.२ | २४.७ |
| लातूर | ३६.८ | २९.५ |
| मुंबई | ३८.४ | ३६.१ |
| नागपूर | ४१.६ | ३६.५ |
| नांदेड | ४०.२ | ३५.३ |
| नंदूरबार | ३७.१ | २७ |
| नाशिक | ३५.२ | २५.५ |
| पुणे | ३३.३ | २३.४ |
| पंढरपूर | ३६.७ | ३०.५ |
| सातारा | ३४.२ | २४.५ |
| सांगली | ३४.६ | २५.८ |
| सोलापूर | ३७.९ | ३०.९ |
| वर्धा | ४२.८ | ३५.५ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग : हिरवा, शुभ दिशा : दक्षिण प्रतिष्ठा वाढेल. सहकार्यांच्या अपेक्षा पूर्ण कराल.

**वृषभ :** शुभ रंग : पिवळा, शुभ दिशा : पूर्व कर्जात कपात होईल. कामातील अडथळे दूर होतील. नवीन कामे जुळून येतील.

**मिथुन :** शुभ रंग : लाल, शुभ दिशा : पूर्व स्पष्ट धोरणांमुळे अनुकूलता येईल. जीवनात आशाजनक स्थिती निर्माण होईल.

**कर्क :** शुभ रंग : केसरी, शुभ दिशा : पश्चिम नशीब साथ देणार नाही. आपल्या मनमोकळेपणाचा फायदा दुसरे लोक घेतील.

**सिंह :** शुभ रंग : गुलाबी, शुभ दिशा : पश्चिम कामे यशस्वी होतील. शारीरिक आरोग्य उत्तम राहिल. मित्रांचे संपूर्ण सहकार्य लाभेल.

**कन्या :** शुभ रंग : निळा, शुभ दिशा : पश्चिम नवीन संबंधांचा फायदा होईल. कामे होणार नाही. आरोग्याची काळजी घ्या.

**तुळ :** शुभ रंग : जांभळा, शुभ दिशा : पूर्व पैसे हातात येतील. एखाद्याच्या सहकार्याने कामात यश मिळेल.

**वृश्चिक :** शुभ रंग : हिरवा, शुभ दिशा : पश्चिम खर्चाची कामे होतील. जुन्या कामातील अडथळे दूर होतील. मित्रांचे सहकार्य लाभेल.


**धनु :** शुभ रंग : पिवळा, शुभ दिशा : पूर्व कौटूंबिक समस्यांचे समाधान होईल. एखाद्या महापुरुषाशी भेट होईल. आर्थिक स्थिती खालावलेली असेल.

**मकर :** शुभ रंग : केसरी, शुभ दिशा : दक्षिण मुलांमुळे तनाव निर्माण होऊ शकतो. एखाद्या वादावर तोडगा निघेल.

**कुंभ :** शुभ रंग : लाल, शुभ दिशा : दक्षिण प्रयत्न अयशस्वी झाल्याने मन दु:खी होईल. एखाद्या जवळच्याच्या व्यवहारात प्रतिकूलता येईल.

**मीन :** शुभ रंग : काळा, शुभ दिशा : पूर्व नशीबाची पूर्ण साथ मिळेल. अधिकारीवर्गाचे सहकार्य मिळेल. कामात दिरंगाई केल्यास नुकसान सोसावे लागेल.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ९८७



### आडवे शब्द

१. हा तर मनाचा स्थायीभाव
४. जवळीक
६. शब्दाचे वजन
८. गुन्हा
११. नशीला
१३. बत्तिशीतील सुळा
१४. बाजू, पक्ष
१५. सोने, दसऱ्याच्या सोन्यासारखी पाने असलेला वृक्ष
१७. लष्करी भाषेत मेजवानी समारंभ
१९. सौन्य
२०. अटीतील शब्द
२१. परसबागेचा दरवाजा
२२. आजूबाजूला, निकट
२५. न्याहरी
२७. 'ने मजसी ने परत मातृभूमीला' हे काव्य लिहिणारे स्वतंत्र्यवीर
२९. विहीर
३०. लेखकासाठी हा महत्त्वाचाच
३३. यजमान
३५. मनाचा झालेला ग्रह
३६. किरकोळ सामान
३७. यश, सिद्धी
३९. युद्ध
४१. अनुत्तीर्ण
४३. धरण, तलाव इ.
४४. लहानसहान
४६. भांडण
४८. मरेपर्यंत
४९. थडगे
५०. चटकन
५२. कशा प्रकारचा
५४. अगणित, पुष्कळ
५६. ओटा, पार
५७. कसोटी पाहणारा
५९. मूल
६०. सतत पिरपिर करणारा
६३. तल्लख, हुशार
६४. मत्सर
६५. जय पराजय
६७. धातूचा धागा
६९. लोखंड (हिंदी)
७०. भार, बोजा
७२. पद्धतशीर, प्रमाणात
७४. भोळा
७५. दया, कीव
७६. मालक
७७. तृण
७८. डिंक (इंग्रजी)

### उभे शब्द

१. शिवशंभोचे एक नाव, चंद्रमणी नावाने ओळखले जाणारे रत्न
२. कमी वयाचा, बालबुद्धीचा
३. तंद्री, नशा
५. गुजराथमधील दत्तात्रेयाचे प्रसिद्ध स्थान
६. सिंह, जंगलाचा राजा
७. रोखलेली नजर
८. शेळी
९. कणखर, उग्र
१०. टक्कर होणे
१२. गुणांची जाण
१६. मनाची तडफड. थगमग
१७. सतत, खूप खाणारा
१८. सततची हालचाल
१९. तापापूर्वी अंग मोडून येणे
२१. सुटकेचा चोरटा मार्ग
२३. व्रत, नेम
२४. चावडी भरवण्याचे ठिकाण
२६. परमेश्वर
२८. मन प्रसन्न करणारे वातावरण
२९. सजावट, देखावा
३१. जिभेला वा त्वचेला झोंबणारे
३२. खोकला
३३. पुरुष व स्त्री
३४. राजबिंडा
३६. फटाक्यांची माळ
३८. प्रचंड आरडाओरड, गोंधळ
४०. नावाडी
४२. स्वयंपाकाचे शास्त्र
४३. पाणी, उदक
४४. बायका-मुली (ग्रा.)
४५. राज्यघटनेच्या मूलभूत तत्त्वांपैकी एक, घटनादुरुस्ती करुन या तत्त्वाचा समावेश करण्यात आला
४६. नवा कोरा
४७. श्रेष्ठ पुरुष
४८. समशेर
५१. पाहिलेले पावसाळे!
५३. 'गमभन'चा प्रसार
५५. संगीतातील एक राग
५८. काटकसर
५९. कापडाची वीण
६१. मारझोड
६२. नवजीवन देणारी रामायणातील वनस्पती
६४. गणपतीचे एक नाव
६६. दालचिनी
६८. लाज
६९. प्रजा
७१. पर्वत
७३. वरमाप घातल्यानंतर होणारा ढीग


### जम्बो शब्दकोडे क्र. ९८६ चे उत्तर

आडवे उत्तर १.पुरातन ४.बरोबर ८.नशा ९.रवानगी १०.कमालखानी हार १४.रीतसर १६.कमान १७.वमन २०.मसाला २१.अवसर २२.गोलबाजार २५.नोटा २६.उजळ २७.टक्कर २८.बारकी ३२.आमनेसामने ३५.सहदेव ३८.खानसामा ३९.मना ४०.बरकत ४२.रव ४३.विसावा ४४.समूह ४६.कणखर ४८.थारा ४९.रजई ५०.मानव ५२.पालव ५४.रीत ५५.कलाकार ५७.गजरा ५९.प्रहार ६०. मगर ६२.साधना ६४.तोटा ६६.मास्तर ६७.रवि ६८.सारा ६९.कवडसा ७१.कमरकस ७३.वंदेमातरम ७५.व ७६.जाम ७७.अंत ७८.माळ ७९.लीन

उभे उत्तर : १.पुजारी २.तरस ३.नवार ४.बगीचा ५.रकमाला ६.साल ७.धनी ८.नरम ११.मानी १२.खानावळ १३.हावरट १५.तबेला १६.कसाटा १९.सरकी २०.मनोकामना २१.अज २२.गेट २३.बाबा २४.जारणमारण २९.कसाबसा ३०.खास ३१.रान ३२.आमदार ३३.मरवा ३४.नेक ३६.हरहर महादेव ३७.देव ३८.खानेसुमारी ४१.तसराळे ४३.विशाल ४५.वाईट ४६.कव ४७.खटला ५१.नतमस्तक ५२.पारध ५३.वग ५५.कर ५६.कासविस ५८.रातोरात ६१.गरम ६३.नामवंत ६५.ससा ६७.रकम ६८.सामान ६९.कमळ ७०.डफली ७२.रजा ७४.रमा

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### इतिहासातील पर्यावरण विषयावर व्याख्यानाचे आयोजन

पुणे (दैनिक संध्या) : जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधत वनराई आणि इतिहास प्रबोधन समिती, महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने "इतिहासातील पर्यावरण" या विषयावरील विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम रविवार, २१ जून २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता स्वा. सावरकर अध्यासन केंद्र, डेक्कन, पुणे येथे होणार आहे. या कार्यक्रमात वनस्पतीशास्त्र तज्ज्ञ, दुर्ग व इतिहास अभ्यासक मा. प्र. के. घाणेकर हे प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करणार आहेत. इतिहासाच्या विविध कालखंडांतील पर्यावरण संवर्धन, जैवविविधतेचे महत्त्व आणि पर्यावरणाशी निगडित ऐतिहासिक संदर्भ यावर ते आपले विचार मांडणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वनराईचे विश्वस्त सागर धारिया असतील. तसेच डॉ. प्रा. निवेदिता एकबोटे, नगरसेविका पल्लवी जावळे या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. पर्यावरण आणि इतिहास यांचा परस्परसंबंध समजून घेण्यासाठी तसेच पर्यावरण संवर्धनाविषयी जनजागृती करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमास पर्यावरणप्रेमी, इतिहास अभ्यासक, विद्यार्थी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.



### 'कौशिक आश्रम' हे कर्तव्यपूर्तीचे केंद्र भय्याजी जोशी यांचे प्रतिपादन

पुणे (दैनिक संध्या) : घरातील ज्येष्ठ मंडळींची विशिष्ट वयानंतर आपण जी सेवा करतो, ती सेवा नसते, तर ते कर्तव्य असते. 'कौशिक आश्रम' हे देखील संघाच्या ज्येष्ठ प्रचारकांची सेवा करणारे कर्तव्यपूर्तीचे केंद्र आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या केंद्रीय कार्यकारिणीचे सदस्य भय्याजी जोशी यांनी शनिवारी केले. पुण्यातील मित्रमंडळ सोसायटीमध्ये असलेल्या 'कौशिक आश्रम' या वास्तूच्या पुनर्निर्माणानिमित्त आयोजित 'कृतज्ञता सत्कार कार्यक्रमा'त श्री. जोशी बोलत होते. संघाच्या पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे संघचालक प्रा. नानासाहेब जाधव आणि संस्थेचे विश्वस्त दिवाकर पांडे यांची कार्यक्रमात प्रमुख उपस्थिती होती. 'कौशिक आश्रम'पुनर्निर्माणाच्या कार्यात मोलाचे योगदान दिलेल्या हितचिंतकांचा प्रातिनिधिक सत्कार जोशी, प्रा. जाधव आणि पांडे यांच्या हस्ते करण्यात आला. 'कौशिक आश्रम' हे विश्रांतीस्थान नाही तसेच ते सेवाकेंद्रही नाही. समाधान आत्मीयतेमध्ये असते. असे आत्मीयतेचे, समाधानाचे, आनंदाचे वातावरण ज्या वयात अनुभवायला मिळाले पाहिजे, असे ज्येष्ठ कार्यकर्ते 'कौशिक आश्रम' येथे राहणार आहेत. त्यांना येथे तसेच वातावरण अनुभवता येईल, असे जोशी यांनी सांगितले. या इमारतीला ऑफिसचे स्वरूप येणार नाही. हे घर आहे, असे वातावरण जिथे अनुभवायला मिळेल, अशी ही वास्तू आहे. पुढेही येथे समाधानाचे वातावरण राहील याची खात्री देतो, असेही भय्याजी जोशी म्हणाले. डॉ. जगदीश करमळकर यांनी मनोगत व्यक्त केले. नागेश पाटील यांनी सूत्रसंचालन केले.



### पोर्शे अपघात प्रकरणात विशाल अग्रवाल पुन्हा अडचणीत

पुणे (दैनिक संध्या) : कल्याणीनगर येथील गाजलेल्या पोर्शे कार अपघात प्रकरणातील आरोपी बिल्डर विशाल अग्रवालच्या अडचणी पुन्हा वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सर्वोच्च न्यायालयाकडून जामीन मिळाल्यानंतर व्हॉट्सअ‍ॅप स्टेटसवर कथितरीत्या जल्लोषाचा व्हिडीओ ठेवल्याचा ठपका ठेवत पुणे पोलिसांनी त्यांचा जामीन रद्द करण्याची तयारी सुरू केली आहे. यासाठी मंगळवारी (दि. 23 जून) सत्र न्यायालयात याचिका दाखल करण्यात येणार असल्याची माहिती पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिली. याकरिता विधी व न्याय विभागाची परवानगी देखील मिळवल्याचे त्यांना सांगितले. कल्याणीनगर येथील भीषण पोर्शे अपघातात दोन तरुण अभियंत्यांचा मृत्यू झाला होता. या प्रकरणाने देशभरात संतापाची लाट उसळली होती. त्यानंतर पुराव्यांशी छेडछाड व गुन्ह्यात सहभाग आढळल्यानंतर विशाल अग्रवालला अटक केली होती. नंतर सर्वोच्च न्यायालयाने काही कठोर अटींसह त्याला जामीन मंजूर केला होता. जामिनाच्या अटींनुसार मृतांच्या कुटुंबीयांना कोणत्याही प्रकारे मानसिक किंवा शारीरिक त्रास होईल, असे कोणतेही कृत्य करता येणार नाही. मात्र, जामीन मिळाल्यानंतर सोशल मीडियावर एक व्हिडीओ व्हायरल झाला. या व्हिडीओत विशाल अग्रवाल आनंदोत्सव साजरा करताना दिसत असल्याचा पोलिसांचा दावा आहे. पुणे पोलिसांच्या तपासात संबंधित व्हिडीओ विशाल अग्रवालने स्वतःच्या व्हॉट्सअ‍ॅप स्टेटसवर ठेवल्याचे समोर आले आहे. हा स्टेटस पाहिलेल्या दोन व्यक्तींचे जबाबही पोलिसांनी नोंदवून घेतले आहेत. हे जबाब आणि उपलब्ध डिजिटल पुरावे न्यायालयासमोर सादर करून जामिनाच्या अटींचे उल्लंघन झाल्याचा दावा पोलिसांकडून करण्यात येणार आहे. दरम्यान, विशाल अग्रवाल याने हा व्हिडीओ 2023 मधील जुना असल्याचा दावा केला होता. त्याचा जामीन मिळाल्यानंतरच्या कोणत्याही जल्लोषाशी संबंध नसल्याचे स्पष्टीकरण देण्यात आले होते. मात्र, पोलिसांनी व्हिडीओ व्हायरल झाल्याची बाब गांभीर्याने घेतली आहे. व्हिडीओ जुना असला तरी तो जामिनानंतर लगेच स्टेटसवर ठेवणे हे मृतांच्या कुटुंबीयांच्या भावना दुखावणारे कृत्य असल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. या प्रकरणातील संवेदनशीलता, देशभरात निर्माण झालेली चर्चा आणि मृतांच्या कुटुंबीयांची मानसिक अवस्था लक्षात घेता जामिनाच्या अटींचा भंग झाल्याचा मुद्दा न्यायालयात मांडला जाणार आहे.

# अग्निसुरक्षेच्या नियमांचे काटेकोर पालन आवश्यक

## संतोष वारीक यांचे प्रतिपादन; 'एफएसएआय' व महाराष्ट्र अग्निशमन सेवातर्फे महाराष्ट्र अग्निशमन कायद्यावर विचारमंथन

पुणे (दै. संध्या)

"राष्ट्रीय बांधकाम संहितेमधील (एनबीसीएस-२०२६) अग्नि व जीवित सुरक्षा नियमांतर्गत राज्यातील सर्व बांधकाम प्रकल्प, डेटा सेंटर, ईव्ही पार्किंग, मेट्रो स्थानके, वेअरहाऊस, तंत्रज्ञान उद्याने यांसारख्या आधुनिक पायाभूत सुविधांसाठी स्वतंत्र अग्निसुरक्षा निकष लागू होणार असून, अग्निसुरक्षा व्यवस्थेत मोठा बदल घडणार आहे," अशी माहिती महाराष्ट्र अग्निशमन सेवेचे संचालक व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य अग्निशमन अधिकारी संतोष वारीक यांनी दिली. अग्निसुरक्षेच्या नियमांचे काटेकोर पालन आवश्यक असून, जागरूकता आणि पूर्वतयारीनेच जीवित व वित्तहानी टाळता येईल, असेही त्यांनी सांगितले.

फायर अँड सिक्युरिटी असोसिएशन ऑफ इंडिया (एफएसएआय) पुणे चॅप्टरतर्फे आयोजित 'एनबीसीएस-२०२६ डिकोडेड: फायर अँड लाईफ सेफ्टी फॉर मॉडर्न इंडिया' या तांत्रिक परिषदेत वारीक बोलत होते. महाराष्ट्र अग्निशमन सेवा, पुणे महानगरपालिका आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) यांच्या सहकार्याने वाकड येथील हॉटेल टिपटॉप इंटरनॅशनल आयोजित कार्यक्रमात महाराष्ट्र अग्निशमन सेवेचे सहाय्यक संचालक किरण हत्याळ, पीएमआरडीएचे मुख्य अग्निशमन अधिकारी देवेंद्र पोटफोडे, एनबीसीएस-२०२६ मसुदा समितीचे सदस्य विनोद कापसे, 'एफएसएआय' पुणे चॅप्टरच्या अध्यक्षा सुजल शाह, माजी अध्यक्ष हृषीकेश कुलकर्णी, सचिव सागर मुनीश्वर यांच्यासह संयोजक सागर कुलकर्णी, सिम्पल जैन, विनायक जोगळेकर, अमोल उंबरजे, सारिका मोरे, शिवम फायरवाला, मानसी कुलकर्णी, मानस भाटिया, कुनाल कोळपकर आणि ऋतुराज कुलकर्णी उपस्थित होते.




संतोष वारीक म्हणाले, "राष्ट्रीय बांधकाम संहितेतील भाग 'एफ' हा अग्नि व जीवित सुरक्षेच्या तरतुदींचा आधारस्तंभ आहे. सुरक्षित आणि शाश्वत शहरे उभारण्यासाठी ही अत्यावश्यक बाब आहे. बदलत्या जोखमी लक्षात घेऊन विशेष अग्निसुरक्षा निकष तयार करण्यात आले आहेत. इमारतींच्या आराखडा व नियोजनाच्या टप्प्यावरच अग्निसुरक्षा उपाययोजनांचा समावेश करणे आवश्यक आहे. बहुतांश आधुनिक इमारतींचे आयुष्य ५० ते ६० वर्षांचे असते. सुरुवातीपासूनच योग्य अग्निसुरक्षा यंत्रणा उभारून त्यांची नियमित देखभाल केल्यास जीवित व वित्तहानीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात कमी करता येते. विकसित देशांप्रमाणे आपल्याकडेही अग्निसुरक्षेची संस्कृती रुजविण्याची गरज आहे. शाळा, महाविद्यालये आणि गृहनिर्माण सोसायट्यांनी नियमित अग्निसुरक्षा जनजागृती व प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करावेत."

अग्निसुरक्षा व्यवस्थेत तंत्रज्ञानाधारित देखरेखीचे महत्त्व अधोरेखित करताना किरण हत्याळ म्हणाले, "महाराष्ट्र अग्निशमन कायद्यांतर्गत इंटरनेट ऑफ थिंग्ज (आयओटी) आधारित 'ऑटोमेटेड कंटिन्युअस मॉनिटरिंग सिस्टिम' (एसीएमएस) लागू करण्यावर भर दिला जात आहे.

'एसीएमएस'मुळे अग्निसुरक्षा यंत्रणेवर रिअल-टाइम देखरेख शक्य होणार आहे. पाण्याची पातळी, पंपांचा दाब, स्मोक डिटेक्शन प्रणाली यांची माहिती क्लाउडवर उपलब्ध राहणार असून, कोणतीही बिघाडस्थिती तातडीने दूर करता येईल. ७० मीटरपेक्षा उंच निवासी इमारती तसेच ३० मीटरपेक्षा उंच व्यावसायिक आणि रुग्णालयीन इमारतींसाठी अशा इलेक्ट्रॉनिक मॉनिटरिंगची अट बंधनकारक करण्यात येणार आहे."

देवेंद्र पोटफोडे यांनीही मार्गदर्शन केले. परिषदेत एनबीसीएस-२०२६ मधील महत्त्वपूर्ण बदल, अंमलबजावणीतील आव्हाने आणि उद्योग क्षेत्रासाठी आवश्यक अनुपालन याविषयी विनोद कापसे यांनी मार्गदर्शन केले. 'स्पार्क कनेक्ट' या नव्या उद्योग उपक्रमाचे सदरीकरण मानसी कुलकर्णी यांनी केले. सुजल शाह यांनी प्रास्ताविकात वाढते शहरीकरण, उंच इमारती आणि बदलते बांधकाम तंत्रज्ञान लक्षात घेता अग्निसुरक्षा नियमांचे आधुनिकीकरण आवश्यक असल्याचे सांगितले. वैभव मंडवगडे यांनी सूत्रसंचालन केले. सागर मुनीश्वर यांनी आभार मानले.

या परिषदे साठी आयोजन मद्धे ईजी-आईओटी, लेहरी वाल्व, केईआई केबल, विघ्नहर्ता टेक्नोलॉजी, बीके इंडस्ट्रीज, ईजोल वाटर टैंक यांचे सहकार्य लाभले.

## शॉपर्स स्टॉपने द पॅव्हेलियन मॉलमध्ये नवीन फ्लॅगशिप स्टोअर केले सुरू

पुणे (दै. संध्या)

शॉपर्स स्टॉप या भारतातील प्रीमियम फॅशन, ब्युटी आणि गिफ्टिंग गंतव्याने पुण्यातील पॅव्हेलियन मॉल येथे आपल्या नवीन फ्लॅगशिप स्टोअरच्या लाँचची घोषणा केली आहे. यासह महाराष्ट्रातील सर्वात गतिमान आणि वेगाने वाढणारी ग्राहक बाजारपेठ पुणे शहरात कंपनीने आपली रिटेल उपस्थिती अधिक दृढ केली आहे. पुण्यामध्ये शॉपर्स स्टॉपचे हे सहावे स्टोअर आहे.


२५,४८३ चौरस फूट क्षेत्रफळात पसरलेले हे नवीन स्टोअर ग्राहकांना खरेदीचा उच्च दर्जाचा आणि विशेष अनुभव देण्यासाठी डिझाइन केले आहे. येथे प्रीमियम फॅशन, सौंदर्य उत्पादने, ॲक्सेसरीज, फूटवेअर, लगेज आणि लाइफस्टाइल ब्रँड्सची विस्तृत श्रेणी एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यात आली आहे. केवळ खरेदीच्या पलीकडे




जाऊन एक उत्तम ठिकाण म्हणून विकसित केलेल्या या स्टोअरमध्ये ग्राहकांसाठी अनेक अनुभवात्मक सुविधा समाविष्ट केल्या आहेत. यामध्ये एक समर्पित पर्सनल शॉपर लाउंज, किड्स प्ले एरिया आणि गेमिंग आर्केड यांचा समावेश आहे, ज्यामुळे ग्राहक आणि त्यांच्या कुटुंबियांसाठी सोयीस्कर आणि आनंददायी वातावरण तयार होते.

या लाँचबाबत मत व्यक्त करत शॉपर्स स्टॉप लिमिटेडचे कस्टमर केअर असोसिएट, मॅनेजिंग डायरेक्टर आणि सीईओ श्री. कविंद्र मिश्रा म्हणाले, पुण्यातील आमच्या नवीन स्टोअरची सुरुवात हा उत्साहवर्धक नवीन अध्याय आहे, जो शहरात प्रीमियम ब्रँड्सचा मोठा पोर्टफोलिओ आणि खरेदीचा उत्तम अनुभव घेऊन येत आहे. आम्ही पुण्यातील ग्राहकांसोबत आमचे नाते अधिक दृढ करण्यासाठी आणि त्यांना विनासयास व उच्च दर्जाचा खरेदीचा अनुभव देण्यासाठी उत्सुक आहोत."

हे स्टोअर विविध श्रेणींमधील आघाडीच्या जागतिक आणि देशांतर्गत ब्रँड्सचा विस्तृत पोर्टफोलिओ एकाच छताखाली आणते. यामध्ये मेन्सवेअरमध्ये अरमानी एक्सचेंज, बॉस, केल्विन क्लेन, टॉमी हिलफिगर, जी-स्टार, गॅस आणि सुपरड्राय; विमेन्स वेस्टर्न वेअरमध्ये फॉरेव्हर न्यू, लेव्हिस, व्हेरो मोडा, रेअरइझम, युएस पोलो असोसिएशन आणि ओन्ली; इंडियन वेअरमध्ये लक्षिता आणि ग्लोबल देसी; लॉंजरीमध्ये वाकोल; ब्युटी आणि फ्रॅग्रन्सेसमध्ये अरमानी ब्युटी, प्राडा ब्युटी, वायएसएल ब्युटी, मॅक, क्लेरिन्स, क्लिनिक आणि रॉबर्टो कव्हाली; सनग्लासेसमध्ये गुस्सी, रे-बॅन, व्हर्साचे, कोच, बरबरी आणि फेरागामो; घड्याळांमध्ये एम्पोरिओ अरमानी, चेरुती, केनेथ कोल, मायकेल कॉर्स आणि फॉसिल; हँडबॅग्जमध्ये गेस, जुईसी कुटूर आणि अल्डो; लगेजमध्ये सॅमसोनाईट आणि डेल्सी; फूटवेअरमध्ये एसिक्स, न्यू बॅलन्स, ॲडिडास आणि विझानो; तर ज्वेलरीमध्ये जिवा आणि गार्गी यांसारख्या ब्रँड्सचा समावेश आहे. हे स्टोअर ग्राहकांना एकाच छताखाली खरेदीचा अतुलनीय प्रीमियम अनुभव देते.



## लायंस क्लब ऑफ पुणे अग्रेसन नवीन कार्यकारिणी समिती जाहीर

पुणे (दै. संध्या)

लायंस क्लब ऑफ पुणे अग्रसेग 2026 - 27 या वर्षासाठीच्या पुणे शहराध्यक्षपदी विनोद कुमार अग्रवाल. पुणे शहर सचिव शुभ अग्रवाल. आणि खजिनदार संजय जालान यांची निवड करण्यात आली.

नुकताच झालेल्या लायंस क्लब ऑफ पुणे कार्यकारणी बैठकीमध्ये 2026 = 27 या वर्षासाठीच्या नवीन कार्यकारिणीची निवड नुकतीच एकमताने करण्यात आली. यामध्ये पुणे शहराध्यक्ष विनोद कुमार अग्रवाल, सचिव शुभ अग्रवाल, खजिनदार संजय जालान आदींची निवड झाली.

यावेळी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे क्लबच्या सर्व सदस्यांनी अभिनंदन केले. आगामी वर्षात विविध समाज उपयोगी व सेवाभावी उपक्रम राबवून क्लबचे कार्य अधिक प्रभावीपणे पुढे नेण्याचा निर्धार नव्या कार्यकारिणीने व्यक्त केला. यावेळी लायंन डिस्ट्रिक्ट गव्हर्नर राजेश सुरेंद्रकुमार अग्रवाल, माजी अध्यक्ष रवी अग्रवाल, लायंन राजेश बंन्सल, लायंन सीमा मनोज अग्रवाल, आदी उपस्थित होते

## पुणे विमानतळावर बँकॉकहून आलेल्या बॅगेत अडीच कोटींचा हायड्रोपोनिक गांजा जप्त

पुणे (दै. संध्या)

पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावर सीमाशुल्क (कस्टम) विभागाने मोठी कारवाई करत अडीच कोटी रुपये किमतीचा हायड्रोपोनिक गांजा जप्त केला आहे. बँकॉकहून पुण्यात दाखल झालेल्या आंतरराष्ट्रीय विमानातील एका बेवारस बॅगेतून तब्बल २१ किलो ५०० ग्रॅम हायड्रोपोनिक गांजा आढळून आल्याने विमानतळावरील सुरक्षा यंत्रणांमध्ये खळबळ उडाली आहे. या प्रकरणामागे आंतरराष्ट्रीय अमली पदार्थ तस्करी रॅकेटचा हात असण्याचे बोलले जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गुरुवारी रात्री बँकॉकहून पुणे विमानतळावर आलेल्या विमानातील प्रवाशांनी आपापले सामान ताब्यात घेतले. मात्र, एक बॅग दीर्घकाळ कन्व्हेयर बेल्टवर पडून होती. बराच वेळ उलटल्यानंतरही कोणीही त्या बॅगेवर दावा न केल्याने कस्टम विभागाच्या अधिकाऱ्यांना संशय आला. त्यांनी तत्काळ बॅग ताब्यात घेऊन तिची तपासणी केली. तपासणीदरम्यान बॅगेतून मोठ्या प्रमाणात हायड्रोपोनिक गांजा आढळून आला. या गांजाचे एकूण वजन २१.५ किलो असून, आंतरराष्ट्रीय बाजारात त्याची किंमत सुमारे अडीच कोटी रुपये असल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणावर अमली पदार्थ सापडल्याने तपास यंत्रणा सतर्क झाल्या आहेत. अधिकाऱ्यांनी सांगितले की, हायड्रोपोनिक गांजा हा सामान्य गांजाच्या तुलनेत अधिक महाग आणि अधिक नशा देणारा मानला जातो. विशेष तंत्रज्ञानाच्या साहाय्याने नियंत्रित वातावरणात त्याची लागवड केली जाते. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात त्याला मोठी मागणी असून, त्याची तस्करी संघटित गुन्हेगारी टोळ्यांकडून केली जाते.

## पुण्यात नालेसफाईवर १६४ कोटी खर्च; तरीही पावसात रस्ते जलमय, महापालिकेवर प्रश्नचिन्ह

पुणे (दै. संध्या)

दर वर्षी पावसाळ्यापूर्वी नालेसफाई आणि पावसाळी चेंबरमधील गाळ काढण्यासाठी महापालिका कोट्यवधी रुपयांचा खर्च करत असते, तरीही पाऊस सुरू होताच शहरातील रस्ते जलमय होण्याचे चित्र कायम आहे. गेल्या सहा वर्षांत या कामांसाठी तब्बल १६४ कोटी रुपये खर्च करण्यात आले. मात्र, कर्वेनगर, कोथरूड, वारजे, हडपसर, कात्रज, सिंहगड रस्ता आणि मध्यवर्ती भागांमध्ये पाणी साचण्याच्या तक्रारी कमी झालेल्या नाहीत. त्यामुळे नालेसफाईच्या कामांचा दर्जा, खर्चाची परिणामकारकता आणि देखरेखीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

महापालिकेच्या सर्वसाधारणसभेसाठी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे नगरसेवक दत्तात्रय बहिरट यांनी नालेसफाईवरील खर्चाची सविस्तर माहिती मागविली होती. २०१७ ते २०२६ या नऊ वर्षांच्या कालावधीतील खर्चाचा तपशील विचारण्यात आला होता. मात्र, प्रशासनाने केवळ २०२०-२१ ते २०२५-२६ या सहा वर्षांतीलच माहिती सादर केली. प्रशासनाने सादर केलेल्या आकडेवारीनुसार, २०२०-२१ मध्ये १४ निविदांद्वारे सुमारे ३८ कोटी रुपये खर्च करण्यात आले. त्यानंतर २०२१-२२ मध्ये १५ निविदांवर ३३ कोटी रुपये खर्च झाले. २०२३-२४ मध्ये १७ निविदांसाठी ४२ कोटी रुपयांहून अधिक निधी खर्च करण्यात आला, तर २०२४-२५ मध्ये १७ निविदांवर ४१ कोटी रुपयांची कामे करण्यात आली. या कालावधीत नालेसफाईसाठी १२१ कोटी, तर पावसाळी चेंबरमधील गाळ काढण्यासाठी ४३ कोटी रुपये खर्च झाल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.

# 'एमआयटी एडीटी' विद्यापीठात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

## विश्वशांती घुमटाच्या साक्षीने सामूहिक योगासने; 'निरोगी वृद्धत्वासाठी योग'चा संदेश

पुणे (दै. संध्या)

'निरोगी वृद्धत्वासाठी योग' या संकल्पनेवर आधारित येथील एमआयटी आर्ट, डिझाईन अँड टेक्नॉलॉजी (एडीटी) विद्यापीठात सामूहिक योगासनांच्या प्रात्यक्षिकांद्वारे १२ वा आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. समग्र विश्वाला शांततेचा संदेश देणाऱ्या संत ज्ञानेश्वर महाराज विश्वशांती घुमटाच्या साक्षीने झालेल्या या योगोत्सवात विद्यार्थी, पालक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. यावेळी उपस्थितांनी निरोगी जीवनासाठी दररोज योगाभ्यास करण्याचा संकल्प केला.

हा आंतरराष्ट्रीय योग दिन जगातील सर्वात उंच 'विश्वशांती घुमट' या ठिकाणी दरवर्षीप्रमाणे साजरा करण्यात आला. विज्ञान आणि अध्यात्माचा अनोखा संगम साधणाऱ्या या भव्य घुमटाची संकल्पना व निर्मिती माईर्स शिक्षण समुहाचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांनी केली आहे.




भारत सरकारच्या आयुष मंत्रालय, आंतरराष्ट्रीय नॅचरोपॅथी संघटना, मोरारजी देसाई राष्ट्रीय योग संस्थान, आर्ट ऑफ लिव्हिंग, सूर्या फाउंडेशन आणि एमआयटी एडीटी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ होलिस्टिक डेव्हलपमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने, कार्याध्यक्ष प्रा. डॉ. मंगेश कराड यांच्या मार्गदर्शनाखाली या भव्य योगोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यापीठाच्या कार्यकारी संचालक प्रा. डॉ. सुनीता कराड, कुलगुरू प्रा. डॉ. राजेश एस., प्र-कुलगुरू डॉ. मोहित दुबे, परीक्षा नियंत्रक डॉ. ज्ञानदेव निलवर्ण, स्कूल ऑफ होलिस्टिक डेव्हलपमेंटचे संचालक व कार्यक्रमाचे मुख्य समन्वयक डॉ. अतुल पाटील, क्रीडा विभागाचे संचालक प्रा. पद्माकर फड, कॅम्पस संचालक दिलीप पाटील आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. अतुल पाटील यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर विद्यापीठाच्या नियमित आरोग्य सराव सत्रांच्या व्हिडिओ अहवालाचे सादरीकरण आणि विशेष 'योग पुस्तिकेचे' प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

अध्यक्षीय भाषणात प्रा. डॉ. सुनीता कराड म्हणाल्या, "योग ही केवळ शारीरिक कसरत नसून ती जीवन जगण्याची कला आहे. आपल्या धावपळीच्या युगात मानसिक संतुलन आणि शारीरिक सुदृढता राखण्यासाठी योग हाच एकमेव मार्ग आहे."

कुलगुरू प्रा. डॉ. राजेश एस. म्हणाले, "'निरोगी वृद्धत्वासाठी योग' हा संदेश आजच्या तरुण पिढीने आत्मसात करणे गरजेचे आहे, जेणेकरून ते भविष्यात सक्षम नागरिक बनू शकतील."

मुख्य सत्रात स्कूल ऑफ होलिस्टिक डेव्हलपमेंटच्या योग तज्ज्ञांनी उपस्थितांकडून 'कॉमन योग प्रोटोकॉल'नुसार (CYP) योगासने आणि ध्यान सत्र करवून घेतले. राष्ट्रगीताने या यशस्वी सोहळ्याची सांगता झाली.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### पदाधिकाऱ्यांच्यावतीने आयोजित छायाचित्र प्रदर्शनाचा समारोप

पुणे (दैनिक संध्या) : संसदेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या वाढदिवसानिमित्त महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस आणि राज्य विद्यार्थी काँग्रेसच्या आजी-माजी पदाधिकाऱ्यांच्या वतीने आयोजित छायाचित्र प्रदर्शनाचा समारोप उत्साहात झाला. यावेळी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व राज्याचे वरिष्ठ प्रवक्ते गोपाळदादा तिवारी यांनी राहुल गांधी यांच्या नेतृत्वावर भाष्य केले. बाळासाहेब ठाकरे कला दालन येथे आयोजित करण्यात आलेल्या या प्रदर्शनात राहुल गांधी यांच्या जीवनातील विविध पैलू, देशातील सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी केलेले प्रयत्न आणि त्यांच्या सार्वजनिक जीवनातील महत्त्वपूर्ण क्षण छायाचित्रांच्या माध्यमातून मांडण्यात आले होते. यावेळी बोलताना गोपाळदादा तिवारी म्हणाले की, स्वातंत्र्यपूर्व काळात विविध सत्तांमध्ये विभागलेला आणि परकीय राजवटीच्या अधिपत्याखाली असलेला भारत, महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू, सरदार पटेल, मौलाना आझाद, भगतसिंग, राजगुरू आणि हजारो स्वातंत्र्यसैनिकांच्या त्याग व संघर्षातून स्वतंत्र आणि लोकशाही प्रजासत्ताक राष्ट्र म्हणून उभा राहिला. या राष्ट्रउभारणीत काँग्रेसचे योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी सांगितले.

### राहुल गांधी, दीप्ती चवधरी आणि चंदू कदम यांचा वाढदिवस वृक्षारोपण करून साजरा



पुणे (दैनिक संध्या) : काँग्रेस नेते तथा खासदार राहुल गांधी, पुणे शहर जिल्हा काँग्रेस समितीच्या पश्चिम विभागाच्या अध्यक्षा दीप्ती चवधरी आणि पुणे महानगरपालिकेतील काँग्रेस गटनेते चंदू कदम यांच्या वाढदिवसानिमित्त पुणे शहर काँग्रेस ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. काँग्रेस भवन येथे आयोजित या कार्यक्रमाचे आयोजन ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष द. स. पोळेकर यांनी केले होते. यावेळी पश्चिम विभागाच्या अध्यक्षा दीप्ती चवधरी आणि पूर्व विभागाचे अध्यक्ष प्रशांत जगताप यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. काँग्रेस भवनच्या परिसरात सोनचाफा आणि नारळाची रोपे लावून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. त्यानंतर ज्येष्ठ नागरिक संघाच्या कार्यालयात केक कापून आणि वाढदिवसाची गीते गाऊन वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी दीप्ती चवधरी, प्रशांत जगताप, द. स. पोळेकर यांच्यासह पुणे शहर काँग्रेस ज्येष्ठ नागरिक संघाचे पदाधिकारी आणि सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत वृक्षारोपणाचा उपक्रम राबविल्याबद्दल उपस्थितांनी समाधान व्यक्त केले. पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येकाने पुढाकार घेण्याची गरज असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.

### गाडीत मटेरियल भरण्यावरून कामगारावर कटरने हल्ला; निघोजे मधील घटना

चाकण (दैनिक संध्या) : कंपनीतील कामाच्या वादातून एका कामगाराने दुसऱ्या कामगारावर कटरने हल्ला करून गंभीर जखमी केल्याची घटना घडली. निघोजे हद्दीतील महिंद्रा कंपनीच्या गेट क्रमांक १२ जवळील इम्पिरियल ऑटो कंपनीत बुधवारी (दि.१७) रात्री साडे नऊ वाजण्याच्या सुमारास हा प्रकार घडला. दक्षिण महाळुंगे इंगळे एमआयडीसी पोलिस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कृष्णा दादाराव खिरडकर (वय २५, सध्या रा. निघोजे, मूळ रा. म्हसरुळ, ता. जाफरा) यांनी याप्रकरणी महाळुंगे इंगळे एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार विपुल निरंजन शिंदे (वय २४, सध्या रा. निघोजे, मूळ रा. महागाव, जि. यवतमाळ) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महाळुंगे इंगळे एमआयडीसी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जखमी कृष्णा खिरडकर आणि विपुल शिंदे हे एकाच ठिकाणी काम करतात. काम करताना मटेरियल गाडीत टाकण्याच्या कारणावरून आरोपी विपुल शिंदे हा विशाल सोनवणे यास शिवीगाळ करत होता. त्यावेळी फिर्यादी कृष्णा खिरडकर यांनी शिवीगाळ करू नको असे सांगितल्याचा राग मनात धरून आरोपीने फिर्यादी कृष्णा यांना शिवीगाळ व दमदाटी केली. यानंतर आरोपीने हातातील कटरने फिर्यादी कृष्णा यांच्या उजव्या हाताच्या पोटरीवर तसेच डाव्या हाताच्या मधल्या बोटावर वार करून गंभीर जखमी केले. जखमी खिरडकर यांच्यावर उपचार सुरू आहेत. दक्षिण महाळुंगे इंगळे एमआयडीसी पोलिस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपींचा शोध सुरू असल्याची माहिती महाळुंगे पोलिसांनी दिली.

### भोंदूबाबासह महिला आरोपींचा असहकार

पुणे (दैनिक संध्या) : ईश्वराचा अवतार असल्याचे सांगत एका उच्चशिक्षित महिलेवर बलात्कार केल्याप्रकरणात छळ व इतर गंभीर आरोपांखाली दाखल गुन्ह्यात आरोपींकडून जप्त करण्यात आलेल्या लॅपटॉपमधील पुरावे मिळवायचे आहेत, मात्र लॅपटॉपच्या पासवर्डची मागणी केली असता आरोपींनी तो दिला नाही. आरोपी हे जाणूनबुजून तपासामध्ये सहकार्य करत नसल्याची माहिती तपास अधिकारी यांनी न्यायालयात दिली.


**जाहीर नोटीस**

**मा. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी जुन्नर-आंबेगाव यांचे कोर्टात.**

क्र. फौज जन्म-मृत्यू/एसआ/78/26 — दिनांक:- 12.06.2026.

**नोटीस**

काझी इम्रान फेमुद्दीन, रा. नारायणगाव ता. जुन्नर, जि. पुणे - **अपिलार्थी**

**विरुध्द**

निबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी
ग्राम अधिकारी/मुख्याधिकारी - **प्रतिवादी**
**ग्रामपंचायत वारूळवाडी**

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमुद किरकोळ फौजदारी अर्ज, **अर्जदार काझी इम्रान फेमुददीन रा नारायणगाव ता जुन्नर जि पुणे** यांचा यांची मुलगी नामे **तस्मीया इम्रान काझी** यांचा/हिचा जन्म **9.10.2016** रोजी **मोजे वारूळवाडी, ता. जुन्नर जि. पुणे** येथे झालेला आहे. यांचा जन्म नोंदीचा हुकुम मिळविण्याकरीता अर्जदार यांनी या न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, कलम १३(३) प्रमाणे फौजदारी **किरकोळ अर्ज नं. 78/26 दिनांक 6.3.2026** रोजी दाखल केलेला आहे. सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस वृतपत्रात प्रसिध्द झाल्यापासुन 15 दिवसांचे आत या न्यायालयात स्वतः अथवा आपले वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणने कागदपत्रांसोबत मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणती. ही हरकत न आल्यास सदर अर्जास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील हुकुम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**आज दि.** 12/6/2026 रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यांनीशी ही जाहीर नोटीस दिली असे.

शिक्का

**सही/-**
**(अर्चना तांबे)**
**अति. उपविभागीय दंडाधिकारी**
**जुन्नर- आंबेगाव उपविभाग मंचर (पुणे)**


# मनसुख मांडविया यांची भारत बिल्डकॉन २०२६ ला भेट

## विक्रमी प्रतिसादाने उद्योगक्षेत्र उत्साहित




नवी दिल्ली (दै. संध्या) :

बांधकाम साहित्य, बांधकाम आणि पायाभूत सुविधा क्षेत्रासाठी आयोजित करण्यात आलेल्या भारत बिल्डकॉन २०२६ या भव्य प्रदर्शनाला केंद्रीय कामगार व रोजगार तसेच युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री मनसुख मांडविया यांनी भेट देऊन विविध दालनांची पाहणी केली. यशोभूमी परिषद केंद्र येथे सुरू असलेल्या या प्रदर्शनाला मिळालेल्या अभूतपूर्व प्रतिसादाचे त्यांनी कौतुक केले.

प्रदर्शनातील उद्योजक, उद्योग प्रतिनिधी, उत्पादक आणि परदेशी खरेदीदारांशी संवाद साधल्यानंतर मंत्री मांडविया म्हणाले की, भारत बिल्डकॉन २०२६ हे उद्योगासाठी अत्यंत प्रभावी आणि यशस्वी व्यासपीठ ठरले आहे. विशेष म्हणजे प्रदर्शनाच्या केवळ पहिल्या दोन दिवसांतील अभ्यागतांची संख्या मागील आवृत्तीतील एकूण अभ्यागतांपेक्षाही अधिक असल्याचे त्यांनी नमूद केले.

ते म्हणाले, "भारताच्या बांधकाम साहित्य आणि बांधकाम क्षेत्राची वाढती ताकद या प्रदर्शनातून स्पष्टपणे दिसून येत आहे. देशांतर्गत तसेच जागतिक बाजारपेठेत भारतीय उत्पादकांसाठी मोठ्या संधी उपलब्ध असून त्याचा लाभ उद्योगाला मिळत आहे."

या प्रदर्शनात ९० हून अधिक देशांतील खरेदीदार तसेच भारतातील १०० हून अधिक शहरांमधील वास्तुरचनाकार, बांधकाम व्यावसायिक, विकासक, वितरक आणि उद्योगतज्ज्ञ सहभागी झाले आहेत. फरशी, दगड, लोखंडी साहित्य, सिमेंट, पोलाद, लाकडी फळ्या, सजावटीचे पत्रे, गृहसजावटीचे साहित्य, स्नानगृह साहित्य आणि इतर बांधकाम साहित्य अशा २४ प्रमुख विभागांचा समावेश प्रदर्शनात करण्यात आला आहे.

भारत बिल्डकॉनचे संचालक विशाल आचार्य यांनी सांगितले की, ९० हून अधिक देशांतील खरेदीदारांची उपस्थिती भारतीय उत्पादन क्षमतेवरील वाढत्या जागतिक विश्वासाचे प्रतीक आहे. या माध्यमातून भारतीय उद्योगांना निर्यातीच्या नव्या संधी उपलब्ध होत असून जागतिक स्तरावरील भागीदारी अधिक मजबूत होत आहे.

संचालक जितेंद्र कथिरिया यांनी सांगितले की, भारतातील १०० हून अधिक शहरांमधील सहभागामुळे हे प्रदर्शन खऱ्या अर्थाने राष्ट्रीय व्यावसायिक मंच बनले आहे. उत्पादक, वितरक, वास्तुरचनाकार, कंत्राटदार आणि प्रकल्प विकासकांसाठी हे प्रदर्शन मोठ्या संधी निर्माण करत आहे.

निर्यात प्रोत्साहन परिषदेचे अध्यक्ष निलेश जेटपारिया यांनी सांगितले की, भारत वेगाने जगातील महत्त्वाच्या उत्पादन आणि पायाभूत सुविधा बाजारपेठांपैकी एक बनत आहे. अशा प्रदर्शनांमुळे निर्यातीला चालना मिळत असून 'भारतात निर्मिती' आणि 'स्वावलंबी भारत' या संकल्पनांना अधिक बळ मिळत आहे.

भारत बिल्डकॉनचे संचालक विजय अघारा यांनी प्रदर्शनाला मिळालेल्या विक्रमी प्रतिसादाचे स्वागत करताना सांगितले की, उद्योगाला एका एकात्मिक राष्ट्रीय व्यासपीठाची आवश्यकता होती आणि भारत बिल्डकॉनने ती यशस्वीरित्या पूर्ण केली आहे.

भारतातील बांधकाम आणि बांधकाम साहित्य उद्योग हा देशाच्या आर्थिक विकासाचा प्रमुख आधारस्तंभ मानला जातो. पायाभूत सुविधा विकास, शहरीकरण, गृहनिर्माण, वाहतूक आणि औद्योगिक मार्गिका प्रकल्पांमुळे या क्षेत्रातील मागणी सातत्याने वाढत आहे. त्यामुळे भारत बिल्डकॉनसारखी प्रदर्शने उद्योगाच्या वाढीसाठी महत्त्वाची भूमिका बजावत आहेत.

२१ जूनपर्यंत सुरू राहणारे भारत बिल्डकॉन २०२६ हे प्रदर्शन जगभरातील उत्पादक, निर्यातदार, खरेदीदार आणि धोरणकर्त्यांना एकत्र आणत असून व्यवसाय वृद्धी, तंत्रज्ञान देवाणघेवाण आणि आंतरराष्ट्रीय सहकार्यासाठी प्रभावी व्यासपीठ ठरत आहे.

भारताला बांधकाम साहित्य आणि बांधकाम क्षेत्रातील जागतिक नेतृत्वाकडे नेण्याच्या दिशेने हे प्रदर्शन एक महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

## येरवडा खुले कारागृहात अमनोरा अचिव्हर्स चॅप्टरतर्फे वृक्षारोपण



पुणे (दै. संध्या) :

सॅटरडे क्लब ग्लोबल ट्रस्ट अंतर्गत कार्यरत अमनोरा अचिव्हर्स चॅप्टरच्या वतीने येरवडा येथील खुले कारागृह परिसरात पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. या उपक्रमात विविध प्रजातींच्या ५५ वृक्षांची लागवड करण्यात आली. कार्यक्रमास येरवडा खुले कारागृहाचे अधीक्षक शामकांत शेडगे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. तसेच सॅटरडे क्लब ग्लोबल ट्रस्टचे पूर्व विभाग प्रमुख राजेंद्र कोते, उपविभाग प्रमुख सूरज गायकवाड, अमनोरा अचिव्हर्स चॅप्टरच्या अध्यक्षा माया तुळपुळे, सचिव धनंजय तुळपुळे, सुधीर गांगर्डे, कोषाध्यक्ष सुमित मुगावे, निशा श्रेयकर तसेच विविध विभागांतील उद्योजक, कारागृह अधिकारी व अमनोरा अचिव्हर्स चॅप्टरचे सुमारे ३० सदस्य उपस्थित होते. या उपक्रमांतर्गत बहावा, मोहोगनी, बेल, कडुनिंब, कपूर, आपटा आदी पर्यावरणपूरक वृक्षांची लागवड करण्यात आली. वृक्षसंवर्धन आणि पर्यावरण संरक्षणाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. यावेळी अधीक्षक शामकांत शेडगे यांनी सॅटरडे क्लब ग्लोबल ट्रस्टच्या सामाजिक आणि पर्यावरणपूरक कार्याचे कौतुक केले. पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येकाने पुढाकार घेणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमादरम्यान उद्योजक गिरीश देशमुख यांनी खुले कारागृहासाठी गवत कापण्याचे यंत्र भेट दिले. तसेच वृक्षांना नियमित पाणीपुरवठा व्हावा यासाठी अमोल सदानशिवे यांच्या माध्यमातून सॅटरडे क्लब ग्लोबल ट्रस्टतर्फे पाण्याची साठवण टाकी उपलब्ध करून देण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुधीर गांगर्डे यांनी केले. पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती आणि सामाजिक बांधिलकी जोपासण्याच्या दृष्टीने हा उपक्रम यशस्वी ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## भोसे येथे विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप



चाकण (दै. संध्या) :

विद्यार्थ्यांच्या उज्वल भवितव्यासाठी खेड तालुक्यातील भोसे येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. चाकण नगरपरिषदेचे गटनेते तथा नगरसेवक नितीन गोरे, उद्योजक श्याम राक्षे व शहर उपप्रमुख प्रकाश राजनकर आदींच्या हस्ते शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी माजी नगरसेवक राहुल कांडगे, विशाल नायकवाडी, संतोष लेंडघर, हर्षद लेंडघर, महेश शेवकरी, मंगेश कांडगे, प्रीतम परदेशी, प्रकाश गोरे, शशिकांत जाधव, दीपक गोरे, सुनील शेवकरी, किरण कौटकर, श्याम राक्षे, राहुल कांडगे, अभिजीत जाधव, किरण टिळेकर, दीपक लोणारी, मच्छिंद्र लोणारी, मुचकुंद जाधव, तुकाराम कुटे, मुख्याध्यापक निवृत्ती गाडेकर आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. नितीन गोरे यांनी यावेळी प्रकाश राजनकर यांनी सर्वांना बरोबर घेऊन विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी हा अभिनव उपक्रम राबविल्या बद्दल प्रकाशभाऊ राजनकर यांचे कौतुक केले. मुचकुंद जाधव यांनी सर्वांचे आभार मानले.

## प्रकाशभाऊ राजनकर यांच्या पुढाकारातून शालेय साहित्याचे वाटप

चाकण (दै. संध्या) :

देणाराने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे, घेता घेता एक दिवस देणाऱ्याचे हात घ्यावे, हे ब्रिद सत्यात उतरवणारे येथील युवा उद्योजक व शिवसेनेचे चाकण शहर उपप्रमुख प्रकाशभाऊ राजनकर यांच्या पुढाकारातून चाकण येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनिषा गोरे, उपनगराध्यक्षा सुवर्णा राक्षे व गटनेते नितीन गोरे यांच्या हस्ते शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी नगरसेविका रूपाली कांडगे, जयश्री नायकवाडी, स्वाती लेंडघर, हर्षद लेंडघर, महेश शेवकरी, मंगेश कांडगे, आरती परदेशी, प्रकाश गोरे, साधना गोरे, पुनम शेवकरी, अनिता घोगरे, अनिल लोहकरे, शशिकांत जाधव, किरण कौटकर, श्याम राक्षे, राहुल कांडगे, अभिजीत जाधव, रणजीत जरे, आदर्श शिक्षक नारायण करपे आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त मुलांसोबत योगाचा उत्सव



मुंबई (दै. संध्या) :

आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने निक इंडिया आणि इंडियाज इंटरनॅशनल मुव्हमेंट टू युनाईट नेशन्स यांच्या संयुक्त विद्यमाने स्पार्क अ चेंज फाउंडेशन येथे विशेष योग कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. मुलांमध्ये आणि त्यांच्या कुटुंबांमध्ये योगाविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

युवा नेतृत्वाखाली कार्य करणाऱ्या संस्थेच्या आरोग्यविषयक उपक्रमाच्या पाचव्या वर्षानिमित्त आयोजित या कार्यक्रमात मुलांसाठी संवादात्मक योग सत्र घेण्यात आले. योग प्रशिक्षक रजनी पवार यांनी मुलांना विविध योगासने, शरीर ताणण्याचे व्यायाम आणि श्वसनक्रिया शिकविल्या. योग हा आनंददायी आणि सहज अंगीकारता येणारा जीवनमार्ग आहे, हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे मुलांच्या आवडत्या बिट्टू आणि हॅपी या पात्रांची उपस्थिती. या दोन्ही पात्रांनी मुलांसोबत योगासने करत त्यांना प्रोत्साहित केले. त्यामुळे संपूर्ण कार्यक्रमात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमात आयोजित करण्यात आलेल्या "योगासन आव्हान" स्पर्धेला मुलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. ठराविक वेळेत विविध योगासने करून दाखविताना मुलांनी आपले कौशल्य सादर केले. बिट्टू आणि हॅपी यांच्या सहभागामुळे या उपक्रमात अधिक रंगत आली.

यावेळी संस्थेच्या प्रतिनिधींनी सांगितले की, मुलांचा सर्वांगीण विकास मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर अवलंबून असतो. त्यामुळे लहान वयापासूनच योगासारख्या चांगल्या सवयी रुजविणे आवश्यक आहे. या उपक्रमातून मुलांना योगाचा आनंद अनुभवता आला असून, भविष्यातही अशा उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

# हॅबिल्डचा दहावा जागतिक विक्रम




मुंबई (दै. संध्या) :

आंतरराष्ट्रीय योग दिन २०२६ निमित्त आरोग्यदायी सवयी विकसित करण्यासाठी कार्यरत असलेल्या हॅबिल्ड या व्यासपीठाने आणखी एक ऐतिहासिक टप्पा गाठत आपला दहावा जागतिक विक्रम प्रस्थापित केला आहे. योग सप्ताहादरम्यान एक कोटींहून अधिक नागरिक या योग चळवळीत सहभागी झाले असून, जगातील सर्वात मोठ्या सामुदायिक आरोग्य मोहिमांपैकी एक म्हणून या उपक्रमाची नोंद झाली आहे.

"प्रत्येक घरात योग, दररोज योग" या देशव्यापी अभियानांतर्गत ही उल्लेखनीय कामगिरी साध्य करण्यात आली. योग हा केवळ एका दिवसापुरता मर्यादित न राहता प्रत्येकाच्या दैनंदिन जीवनाचा भाग व्हावा, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला आहे.

यंदाच्या आंतरराष्ट्रीय योग दिनाची "निरोगी वृद्धत्वासाठी योग" ही संकल्पना लक्षात घेऊन या मोहिमेत नियमित योगाभ्यासाचे शारीरिक आरोग्य, मानसिक संतुलन आणि दीर्घकालीन निरोगी जीवनासाठी असलेले महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

या चळवळीला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, एका दिवसातच वीस लाखांहून अधिक लोकांनी सहभाग नोंदविला. प्रतिबंधात्मक आरोग्य आणि शाश्वत जीवनशैली अंगीकारण्याकडे समाजाचा वाढता कल या माध्यमातून स्पष्ट होत असल्याचे दिसून आले.

भारतीय तंत्रज्ञान संस्थेचे माजी विद्यार्थी, शासनमान्य योगतज्ज्ञ आणि हॅबिल्डचे सहसंस्थापक सौरभ बोथरा यांनी या व्यासपीठाची स्थापना केली आहे. सातत्यपूर्ण सराव आणि चांगल्या सवयींच्या माध्यमातून दीर्घकालीन आरोग्य साध्य करता येते, या विचारावर हा उपक्रम आधारित आहे.

या यशाबद्दल बोलताना सौरभ बोथरा म्हणाले, "दहावा जागतिक विक्रम हा केवळ आकड्यांचा विषय नसून आरोग्यदायी जीवनशैली स्वीकारणाऱ्या वाढत्या चळवळीचे प्रतीक आहे. योग दिनाचे महत्त्व अनन्यसाधारण असले तरी खरा बदल तेव्हाच घडतो, जेव्हा योग दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनतो. 'प्रत्येक घरात योग, दररोज योग' या अभियानाद्वारे आम्ही लाखो नागरिकांना दीर्घकालीन आरोग्यदायी सवयी विकसित करण्यासाठी प्रेरित करत आहोत."

या उपक्रमांतर्गत सहभागी नागरिकांना विनामूल्य ऑनलाईन योगवर्ग, सामुदायिक उपक्रम आणि सवय निर्मितीसाठी आवश्यक मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात आले. सर्व वयोगटांतील आणि विविध शारीरिक क्षमतांच्या व्यक्तींसाठी हा उपक्रम खुला ठेवण्यात आला होता.

## 'डेव्हलपमेंट लीडरशिप' पदविका अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू

Azim Premji University

पुणे (दै. संध्या) :

अझीम प्रेमजी विद्यापीठात 'पोस्टग्रेज्युएट डिप्लोमा इन डेव्हलपमेंट लीडरशिप' (विकास क्षेत्रातील नेतृत्व गुण) या पदविका अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असुन अर्ज करण्याची शेवटची तारीख- ११ ऑक्टोबर २०२६ आहे हा ११ महिन्यांचा अर्धवेळ (पार्ट-टाईम) पदविका अभ्यासक्रम सामाजिक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या आणि विकास आराखडे, नागरी समाज व संस्थात्मक संस्कृती याविषयीची आपली दृष्टी अधिक समृद्ध करू इच्छिणाऱ्या व्यक्तींसाठी तयार करण्यात आला आहे. विकास क्षेत्रातील नेत्यांना सर्वसमावेशक संघ आणि संस्थांचे नेतृत्व करण्यासाठी आवश्यक असणारे कौशल्य या अभ्यासक्रमातून मिळते. विशेष म्हणजे, हा अभ्यासक्रम सुरू असतानाही प्रवेश घेतलेल्या व्यक्तींना त्यांचे सध्याचे काम किंवा नोकरी सुरू ठेवता येणार आहे. तीन सत्रांमध्ये विभागलेल्या या अभ्यासक्रमात विद्यापीठात प्रत्यक्ष उपस्थित राहून आणि ऑनलाईन अशा दोन्ही पद्धतींनी शिकण्याची संधी (ब्लेंडेड लर्निंग) दिली जाणार आहे. हा अभ्यासक्रम विकास क्षेत्रात आठ किंवा त्याहून अधिक वर्षांचा अनुभव असलेल्या मध्यम ते वरिष्ठ पातळीवरील व्यावसायिकांसाठी डिझाइन केला आहे; जे आधीपासूनच आपल्या संस्थेत नेतृत्वाची धुरा सांभाळत आहेत किंवा लवकरच अशी जबाबदारी स्वीकारणार आहेत. स्वयंसेवी संस्था (एनजीओ), सामाजिक चळवळी आणि तळागाळात काम करणाऱ्या संस्थांमधील कार्यकर्त्यांसाठी हा अभ्यासक्रम खुला आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### महापालिकेत बदल्यांचा धमाका; 272 कर्मचाऱ्यांच्या विभागांतर्गत बदल्या

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत प्रशासकीय स्तरावर मोठ्या प्रमाणात विभागांतर्गत बदल्या करण्यात आल्या असून, एकूण 272 कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश प्रशासनाने जारी केले आहेत. या बदल्यांमुळे विविध विभागांच्या कामकाजात मोठे फेरबदल होणार असून प्रशासन अधिक गतिमान करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार 75 कनिष्ठ अभियंते, 36 उपअभियंते, 103 लिपिक तसेच 58 मुख्य लिपिक यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. अनेक कर्मचारी दीर्घकाळ एकाच विभागात कार्यरत असल्याने प्रशासनाने नियमानुसार ही बदली प्रक्रिया राबविल्याचे सांगितले जात आहे. महापालिकेच्या विविध क्षेत्रीय कार्यालयांसह अभियांत्रिकी, प्रशासकीय आणि लेखा विभागांमध्ये या बदल्यांचा प्रभाव दिसून येणार आहे. नव्या ठिकाणी नियुक्ती झालेल्या कर्मचाऱ्यांनी लवकरात लवकर पदभार स्वीकारण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. या व्यापक बदली प्रक्रियेमुळे विभागीय कामकाजात समन्वय वाढण्यास मदत होईल, तसेच नागरिकांना अधिक कार्यक्षम सेवा देण्याच्या दृष्टीने प्रशासनाला बळकटी मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. महापालिकेतील या मोठ्या बदल्यांमुळे कर्मचारी वर्गातही विविध चर्चांना उधाण आले आहे.





### कंत्राटी कर्मचाऱ्यांसाठी 'बायोमेट्रिक' अनिवार्य – स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागांत कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीबाबत आता कडक धोरण अवलंबले जाणार असून, ठेकेदारांमार्फत सेवा देणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांसाठी 'थंब रीडिंग' (बायोमेट्रिक हजेरी) अनिवार्य करण्यात येणार आहे. यापुढे ज्या कंत्राटी कर्मचाऱ्यांची बायोमेट्रिक हजेरी नोंदवली जाईल, त्यांच्याच कामाची बिले कंत्राटदारांना अदा केली जातील, असा निर्णय स्थायी समितीने घेतला आहे, अशी माहिती स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी दिली. महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत सदस्यांनी कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीबाबत आणि कंत्राटदारांच्या देयकांबाबत गंभीर मुद्दे उपस्थित केले होते. महापालिकेच्या उद्यान विभाग, आरोग्य विभाग, वैद्यकीय विभाग, सुरक्षा विभाग आणि विविध तांत्रिक सल्लागार विभागांमध्ये मोठ्या संख्येने कंत्राटी कर्मचारी कार्यरत आहेत. मात्र, अनेकदा प्रत्यक्ष कामगार कामावर हजर नसतानाही त्यांची कागदोपत्री हजेरी लावून बिले उचलली जात असल्याच्या तक्रारी सदस्यांनी बैठकीत केल्या होत्या. सदस्यांच्या या रास्त मागणीची दखल घेत सभापती अभिषेक बारणे यांनी आता बायोमेट्रिक हजेरीशिवाय बिले मंजूर न करण्याचे कठोर निर्देश दिले आहेत. या निर्णयाबाबत बोलताना स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे म्हणाले की, "महापालिकेच्या कामात पारदर्शकता आणणे हे आमचे मुख्य उद्दिष्ट आहे. महापालिकेच्या तिजोरीतून होणारा खर्च हा करदात्यांचा आहे, त्यामुळे त्यात कोणताही गैरप्रकार खपवून घेतला जाणार नाही. मग तो उद्यान विभाग असो, आरोग्य, वैद्यकीय, सुरक्षा विभाग असो किंवा सल्लागार कर्मचारी असोत, सर्वच कंत्राटी कर्मचाऱ्यांची उपस्थिती आता बायोमेट्रिक प्रणालीद्वारेच मोजली जाईल. केवळ बायोमेट्रिक नोंद असलेल्या कामाचेच मोजमाप केले जाईल आणि त्यानुसारच कंत्राटदारांची बिले अदा केली जातील. या निर्णयामुळे कामाच्या ठिकाणी कर्मचाऱ्यांची प्रत्यक्ष उपस्थिती निश्चित होईल आणि बोगस हजेरीला पूर्णपणे आळा बसेल."

### पिंपरी-चिंचवडमधील 650 शाळांना फायर सर्टिफिकेटसाठी नोटीस

पिंपरी (दैनिक संध्या) : शाळांची अग्निसुरक्षा नोंदणी आणि अग्निसुरक्षितता पूर्तता प्रमाणपत्र (फायर सर्टिफिकेट) बंधनकारक आहे. मात्र, पिंपरी-चिंचवड शहरातील शाळांनी फायर सर्टिफिकेट घेण्याकडे दुर्लक्ष केल्याचे समोर आले आहे. त्यामुळे महापालिकेच्या अग्निशमन विभागाने तब्बल 650 शाळा आणि शैक्षणिक संस्थांना फायर सर्टिफिकेट घेण्यासाठी नोटीस बजावली आहे. महापालिकेच्या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने नोंदणी करून दहा दिवसांत फायर सर्टिफिकेट घेण्याचे सूचित करण्यात आले आहे. शहरात 540 खासगी तर, 110 महापालिकेच्या अशा एकूण 650 शाळा आहेत. उन्हाळ्याची सुटी संपून 15 जूनपासून शाळा सुरू झाल्या आहेत. तर, काही इंग्रजी माध्यमाच्या शाळा पूर्वीच सुरू झाल्या आहेत. शाळांमध्ये विद्यार्थी, शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी अग्निसुरक्षा उपाय असणे गरजेचे आहे. महापालिकेच्या



नियमानुसार प्रत्येक शैक्षणिक संस्थेकडे अग्निशमन विभागाचे फायर सर्टिफिकेट असणे बंधनकारक आहे. यासाठी सर्व शाळांना अग्निशामक सुरक्षा प्रमाणपत्राची पूर्तता करण्यासाठी नोटीसा पाठवण्यात आल्या आहेत. सर्व शाळांमध्ये आग प्रतिबंधक उपाययोजना करणे, त्या कार्यान्वित ठेवणे हे संस्थाचालकांची जबाबदारी आहे. मान्यताप्राप्त संस्थेकडून विहित नमुन्यातील प्रमाणपत्र अग्निशमन विभागाकडे सादर करणे बंधनकारक आहे. शाळा इमारतीमधील अग्निशमन यंत्रणा सुरू आहे का ? याबाबत शासन मान्य संस्थेकडून फायर ऑडिट करून घेण्यात यावे. ऑडिटमध्ये काही आक्षेप निघाल्यास त्याची पूर्तता करावी. फायर ऑडिटचा अहवाल महापालिकेस सादर करावा. शैक्षणिक संस्थेची नोंदणी व आवश्यक सुरक्षा अग्नी सुरक्षितता उपाययोजना केल्यास गंभीर दुर्घटना टाळण्यास मोठी मदत होणार आहे.

# स्वरांजलीतर्फे आशा भोसलेंना स्वरांजली, आरोग्य तपासणी

**पिंपरी (दै. संध्या)**

दृष्टीदान पंधरवडानिमित्त 'स्वरांजली म्युझिकल परिवारा' तर्फे आयोजित केलेल्या सांगितिक कार्यक्रमातून स्व आशा भोसले यांना स्वरांजली दिली. मोफत आरोग्य तपासणी शिबिरात ३६० जणांची मोफत तपासणी केली. स्व आशा भोसले यांना आदरांनी म्हणून लाईव्ह ऑर्केस्ट्रा ग. दि. माडगुळकर नाट्यगृह आकुर्डी येथे संपन्न झाला. या कार्यक्रमाचे आयोजन डॉ अंजली कुलकर्णी, सुनील मांडवकर, सचिन गवळीकर तेजस भगत यांनी केले होते.

यावेळी गायक जयश्री चव्हाण आनंद गायकवाड लीना जोशी सोनल वाणी दीप्ती देशपांडे वैशाली सोनवणे शैलेंद्र पाटील स्वाती पाटील,अमराजा आरास, डॉ किरण देशकर,गायत्री रानाळकर, निवृत्ती महाजन, उमेश भोसले, आदम जमादार, सुनिल जोशी, पराग कामत, जहांगीर पठाण, गणेश ओहल,जयश्री दीक्षित, पंकज कथलकर, सचिन गवळीकर, डॉ मैथिली,मनूश्री यांनी स्व. आशा भोसले यांची एकापेक्षा सरस अशी गाणी सादर केली.

यावेळी गायकांनी सादर केलेल्या " आ देखे जरा ,झुमका गिरा रे ,लेकर हम दिवाना दिल, दिल चीज क्या है ,प्यार मे दिल पे, दम मारो दम, याई रे याई रे, ताकी ताकी ताकी रे, इशारो इशारो मे, एक मैं और एक तू, हवा के साथ साथ, या गाण्याला रसिकांचा टाळयांचा प्रतिसाद मिळाला. यावेळी गायकांना अतुल लोंढे, अमन (कीबोर्ड), शिवाजी घोडे (सॅक्सोफ़ोन), रोहित साने (ढोलक), प्रवीण जाधव (पॅड) या वादकांनी साथ संगत केली. यावेळी सुमारे ₹२८,००० किमतीच्या ३५० जणांनी मोफत आरोग्य तपासणीचा लाभ घेतला. यामध्ये संपूर्ण रक्त तपासणी: रक्तातील पेशी, साखरेचे प्रमाण, रक्तदाब : हृदयाचे, संपूर्ण नेत्र तपासणी, दात आणि संपूर्ण मुख तपासणी, ३६महिलांची स्तनाच्या कर्करोग तपासणी (मॅमोग्राफी) केली. रक्त तपासणीमध्ये सीबीसी कोलेस्ट्रेरोल, बीआय, शुगर, बी 12/ डी 3 या चाचण्या केल्या.

118 जणांची नेत्र तपसणी केली. त्यात रेफरक्टिव फंडस फोटोग्राफी/ नोपण कॉन्टॅक्ट टोनयोमेटरी या सारख्या आधुनिक तपासण्या केल्या

या कार्यासाठी समर्थ युवा फौंडेशन आणि दिव्यदृष्टी आय फौंडेशन, सनफार्मा यांचे सहकार्य लाभले. या शिबिरासाठी औंध जिल्हा रुग्णालयातील तज्ञ डॉक्टरांनी विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमा दरम्यान लकी ड्रॉ द्वारे रसिकांना आकर्षक बक्षीस देण्यात आले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रूपाली पाथरे यांनी केले.




## अंकुश जाधव यांना महाराष्ट्र शासनाचा गुणवंत कामगार पुरस्कार जाहीर

**पिंपरी (दै. संध्या)**



कामगार विश्वात प्रतिष्ठेचा मानला जाणारा विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कार अंकुश तुकाराम जाधव यांना जाहीर झाला आहे. महाराष्ट्र शासनाच्या कामगार कल्याण मंडळाकडून हा पुरस्कार जाहीर करण्यात आला. पंचवीस हजार रुपये, सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

जाधव हे गेली 28 वर्ष किर्लोस्कर ऑईल इंजिन्स लि, खडकी येथे इलेक्ट्रिकल मेंटेनन्स विभागात कार्यरत आहेत. जाधव यांचा प्रॉडक्टिव्हिटी, कॉलिटी, सेफ्टी, एनर्जी कंजर्वेशन, यावरील विविध स्पर्धेमध्ये नेहमी सहभाग असतो. त्यांनी राष्ट्रीय स्तरावरील विविध स्पर्धामध्ये अनेक पुरस्कार प्राप्त केले आहेत. सजेशन आणि कायझनच्या माध्यमातून कंपनीच्या उत्पादन वाढीसाठी मोलाचा वाटा उचलला आहे. लो कॉस्ट ऑटोमेशन करून अनेक टेस्टरीघ इन हाऊस त्यांनी बनविल्या आहेत. कंपनीच्या कला, क्रीडा समितीमध्येही त्यांनी कामे केली आहेत. सध्या एनकॉन कमिटी, सेफ्टी कमिटीचे ते सदस्य आहेत. ते उत्तम सूत्रसंचालक आहेत. तसेच क्रीडा समालोचकही आहेत. ते युनियनच्या आयआर कमिटीमध्ये काम करतात. त्यांनी किर्लोस्कर एम्प्लॉईज सोसायटीचे संचालक व व्हाईस चेअरमन म्हणून काम केले आहे.

कंपनीत आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरामध्ये जाधव यांचा सहभाग असतो. कामगारांचे प्रश्न सोडण्यामध्ये त्यांना अधिक रुची आहे. ते सामाजिक, सांस्कृतिक, कला क्रीडा, शैक्षणिक, साहित्यिक, कामगार कल्याण मंडळाच्या विविध उपक्रमामध्ये सहभाग घेत आले आहेत. त्यांना किर्लोस्करचे चेअरमन अतुल किर्लोस्कर यांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरविण्यात आले आहे. तसेच कंपनीच्या मॅनेजिंग डायरेक्टर गौरी किर्लोस्कर यांनी त्यांना एमडी अवार्डने सन्मानित केले आहे.

अंकुश जाधव हे कामगार युनियनचे आयआर कमिटी मेंबर, किर्लोस्कर ऑइल इंजिन्स एम्प्लॉईज सोसायटीचे संचालक व उपाध्यक्ष, सेफ्टी कमिटी एनकॉन कमिटीचे सक्रिय मेंबर, सरदार वल्लभाई पटेल प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष, सांगली जिल्हा मित्र मंडळ, सुवर्ण पार्क, पिंपळे गुरवचे क्रियाशील कार्यकर्ते आहेत. दिलासा संस्था, लक्ष्मण नागरी पतसंस्थेचे ते माजी संचालक आहेत.

## पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर बांधकाम प्रकल्पांचा पाणीपुरवठा बंद करा; नगरसेविका ऐश्वर्या तरस यांची मागणी

**पिंपरी (दै. संध्या)**






पिंपरी-चिंचवड शहरात निर्माण झालेल्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर बांधकाम प्रकल्पांना होणारा पाणीपुरवठा तात्काळ बंद करून उपलब्ध पाणी नागरिकांच्या गरजांसाठी प्राधान्याने उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी शिवसेना नगरसेविका ऐश्वर्या राजेंद्र तरस यांनी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्याकडे केली आहे.

ऐश्वर्या तरस यांनी याबाबत आयुक्तांना निवेदन दिले आहे. त्यात म्हटले आहे की, शहरात सध्या पाण्याची उपलब्धता कमी होत असून अनेक भागांमध्ये नागरिकांना अपुरा व अनियमित पाणीपुरवठा होत आहे. किवळे-रावेत प्रभाग क्र.१६ सह विविध परिसरांमध्ये कमी दाबाने पाणी येणे, अनियमित पुरवठा होणे तसेच पिण्याच्या पाण्याची कमतरता भासत असल्याच्या तक्रारी सातत्याने येत आहेत.

पाण्याचा अशा परिस्थितीत नागरिकांच्या मूलभूत गरजा पूर्ण करणे हे महापालिकेचे प्रथम कर्तव्य असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. त्यामुळे शहरातील निवासी, व्यावसायिक व औद्योगिक बांधकाम प्रकल्पांना महापालिकेमार्फत अथवा इतर माध्यमांतून पुरविण्यात येणारा पाणीपुरवठा तात्पुरता स्थगित करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच बांधकाम व्यावसायिकांनी बांधकामासाठी पुनर्वापरित (Recycled) पाणी, टँकर किंवा इतर पर्यायी स्रोतांचा वापर करावा, अशा सूचना देण्याचीही मागणी करण्यात आली आहे. पाणीटंचाईच्या काळात नागरिकांच्या हिताला प्राधान्य देऊन तातडीने योग्य निर्णय घ्यावा, अशी विनंती नगरसेविका ऐश्वर्या तरस यांनी प्रशासनाकडे केली आहे. शहरातील वाढत्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर या मागणीची चर्चा सुरू असून महापालिका प्रशासन यावर काय निर्णय घेते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## पांडुरंग कदम यांची माथाडी कामगार संघाच्या ट्रान्सपोर्ट नगर निगडी विभाग प्रमुखपदी नियुक्ती

**पिंपरी (दै. संध्या)**



महाराष्ट्र राज्य माथाडी ट्रान्सपोर्ट सुरक्षा रक्षक आणि जनरल कामगार संघाच्या वतीने ट्रान्सपोर्ट नगर, निगडी येथे आयोजित विशेष कार्यक्रमात पांडुरंग बाबुराव कदम यांची संघटनेच्या 'ट्रान्सपोर्ट नगर निगडी विभाग प्रमुख'पदी नियुक्ती करण्यात आली. यावेळी मान्यवरांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

पांडुरंग कदम हे यापूर्वी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे रुपीनगर-तळवडे विभागातील उपविभाग प्रमुख म्हणून कार्यरत होते. त्यांनी आपल्या पदाचा व पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा देत भोसरीचे आमदार महेश लांडगे यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करून आपल्या समर्थकांसह भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला.

कदम हे सध्या मातोश्री माथाडी कामगार सहकारी पतसंस्था मर्यादित, निगडीचे चेअरमन असून कामगार, सहकार आणि सामाजिक क्षेत्रात सक्रिय कार्य करत आहेत. त्यांच्या भाजप प्रवेशामुळे तसेच माथाडी संघटनेतील नव्या जबाबदारीमुळे परिसरातील कामगारांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

यावेळी आमदार महेश लांडगे यांनी पांडुरंग कदम यांचे भाजपमध्ये स्वागत करत त्यांना पुढील सामाजिक व राजकीय वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच कामगारांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी संघटनेची भूमिका अधिक बळकट होईल, असा विश्वास व्यक्त केला.

कार्यक्रमास महाराष्ट्र राज्य माथाडी ट्रान्सपोर्ट सुरक्षा रक्षक आणि जनरल कामगार संघाचे अध्यक्ष संजय बापू निकम, पुणे जिल्हाध्यक्ष आझम खान, पुणे जिल्हा उपाध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, माजी नगरसेवक एस. के. बापू भालेकर, नगरसेवक प्रवीण भालेकर, शिवानीताई नारळे, शीतलताई वरणेकर, सुदेव अप्पा नारळे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

याशिवाय अशोक काळे, इनदास पाटील, अमोल मदने, श्रीकांत मोरे, बाबासाहेब पोते, माऊली पाचपुते, दादा कदम, गोरक्षनाथ दुबाले, नितीन कदम, कैलास तोडकर, सचिन नरवडे तसेच मोठ्या संख्येने मुकादम, माथाडी कामगार व नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान पांडुरंग कदम यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यकर्त्यांच्या उत्स्फूर्त घोषणाबाजी आणि मोठ्या उपस्थितीत हा सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

## पवना धरणात १९ टक्के इतकाच पाणीसाठा शिल्लक; शहरात १५ टक्के पाणी कपात लागू

**पिंपरी (दै. संध्या)**

पवना धरणातील उपयुक्त पाणीसाठा १९ टक्के शिल्लक राहिल्याने आणि यंदाच्या मान्सूनला झालेल्या विलंबामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड शहराच्या पाणीपुरवठ्यात १५ टक्के कपात करण्याच्या सूचना पुणे पाटबंधारे विभागाने पिंपरी चिंचवड महापालिकेला दिल्या आहेत.

त्याअनुषंगाने शहराच्या पाणी पुरवठ्यात आज शुक्रवार, १९ जून २०२६ पासून १५ टक्के कपात करण्यात येत असून नागरिकांनी पाण्याचा वापर जपून व काटकसरीने करावा, असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केले आहे.

पिंपरी चिंचवड शहराला पवना धरणातून पाणीपुरवठा केला जातो. सध्या धरणामध्ये केवळ १९ टक्के इतकाच उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध असून, मान्सूनच्या आगमनास झालेल्या विलंबामुळे आगामी कालावधीतील पाण्याची उपलब्धता आणि वाढती मागणी लक्षात घेता उपलब्ध पाणीसाठ्याचे काटेकोर आणि नियोजनबद्ध व्यवस्थापन करणे आवश्यक झाले आहे.

या पार्श्वभूमीवर पुणे पाटबंधारे विभागाने महापालिकेला पाणीपुरवठ्यात १५ टक्के कपात करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

> उपलब्ध पाणीसाठ्याचे नियोजनबद्ध व्यवस्थापन करण्यासाठी पाणीपुरवठ्यात १५ टक्के कपात करण्यात आली आहे. नागरिकांनी पाण्याचा वापर अत्यंत जपून करावा. वाहन धुणे, बागांना अतिरिक्त पाणी देणे, नळ विनाकारण सुरू ठेवणे यांसारख्या बाबी टाळून पाणी बचतीत सक्रिय सहभाग नोंदवावा. पाण्याची बचत ही प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी असून, पाणी बचतीचे नियम पाळून महापालिकेला सहकार्य करावे.
> – डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

# निरोगी शरीर, निर्मळ मन आणि सजग आत्मा' संदेशासह आंतरराष्ट्रीय योग दिवस

**भोसरी (दै. संध्या)**

'निरोगी शरीर, निर्मळ मन आणि सजग आत्मा' या पवित्र संकल्पाला प्रत्यक्षात साकार करत संत निरंकारी मिशन आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने एक व्यापक योग व आध्यात्मिक चेतना अभियान आयोजित करत आहे. सद्गुरु माता सुदीक्षा जी महाराज यांच्या पावन आशीर्वाद आणि दूरदर्शी मार्गदर्शनाखाली राबवले जाणारे हे प्रेरणादायी अभियान मानवकल्याण, समग्र आरोग्य आणि आत्मिक उन्नतीच्या दिशेने एक अर्थपूर्ण पाऊल आहे.

सद्गुरु माता जींचा प्रेरक संदेश – "स्वस्थ मन, सहज जीवन" या सत्याला अधोरेखित करतो की जीवनाची खरी समृद्धी केवळ शारीरिक स्वास्थ्य नसून मानसिक संतुलन आणि आध्यात्मिक जागरूकतेत आहे. सद्गुरु माता जींनी आपल्या प्रवचनामध्ये अनेकदा उल्लेख केला आहे कि मानवी शरीर ही परमात्म्याची अनुपम देणगी आहे, ज्याची देखभाल आणि सुदृढता व्यक्तीला आपल्या आध्यात्मिक, सामाजिक आणि मानवी जबाबदाऱ्या अधिक उत्तम प्रकारे पार पाडण्यास सक्षम बनवते. हे अभियान योगाला केवळ शारीरिक व्यायाम न मानता आत्मबोध, अंतर्गत शांतता, मानवीय एकता आणि विश्वबंधुत्वाची भावना विकसित करणारी एक समग्र जीवनसाधना म्हणून स्वीकारण्याचा संदेश देते.

याच प्रेरणादायी भावनेनुसार जागतिक योग्य दिनाच्या निमित्ताने संत निरंकारी मिशनतर्फे रविवार, 21 जून 2026 रोजी सकाळी 6:00 वाजता पुणे जिल्ह्यातील मिशनच्या सत्संग भवन भोसरी, पिंपरी, रुपीनगर सह भारतभरातील 1500 हून अधिक केंद्रांवर एकाच वेळी योग शिबिरांचे आयोजन केले जाणार आहे. मिशनच्या विविध शाखांमध्ये स्थानिक योग प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली मोकळ्या मैदानांमध्ये आणि उद्यानांमध्ये होणाऱ्या या कार्यक्रमांमध्ये श्रद्धाळू, सेवादल स्वयंसेवक आणि स्थानिक नागरिक उत्साहाने सहभागी होतील.



या वर्षी संयुक्त राष्ट्रसंघाने घोषित केलेल्या आंतरराष्ट्रीय योग दिनाची थीम आहे "स्वस्थ जीवनासाठी योग". हा संदेश आपल्याला स्मरण करून देतो की खरे आरोग्य केवळ रोगमुक्त शरीरापुरते मर्यादित नसून मानसिक स्थैर्य, भावनिक परिपक्वता, सामाजिक समरसता आणि आध्यात्मिक जागरूकता यांचा समन्वय आहे. या दृष्टिकोनातून संत निरंकारी मिशन योगाला जीवनात संतुलन, सकारात्मकता आणि आत्मजागरूकतेचे प्रभावी साधन मानून समाजात जागरूकता प्रस्थापित करत आहे.

संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनचे सचिव आदरणीय श्री जोगिंदर सुखीजा जी यांनी सांगितले की 2015 पासून फाउंडेशनतर्फे 'योग दिवस' हा राष्ट्रव्यापी अभियान नियमितपणे राबवला जात आहे. योग ही भारताची प्राचीन आणि गौरवशाली परंपरा आहे, जी केवळ शरीर मजबूत करत नाही तर मनाला स्थिरता, विचारांना सकारात्मकता आणि आत्म्याला चेतना प्रदान करते. नियमित योगाभ्यासामुळे तणाव आणि जीवनशैलीशी संबंधित समस्यांवर नियंत्रण मिळवता येते आणि व्यक्ती आत्मिक समाधान, मानसिक आनंद आणि सामाजिक सद्भावाच्या दिशेने अग्रेसर होतो.

आजच्या धावपळीच्या आणि आव्हानात्मक जीवनशैलीत संत निरंकारी मिशनच्या जनकल्याणकारी अभियानाचा हाच उद्देश आहे की समाजात सर्वांगीण कल्याणाबाबत जागरूकता निर्माण करणे, जेणेकरून प्रत्येक व्यक्ती योगाला दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनवून निरोगी, संतुलित, ऊर्जावान आणि आनंदी जीवनाकडे वाटचाल करू शकेल.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### चाकणमधील अंगणवाडीचे सुशोभीकरणाने रुपडे पालटले

चाकण (दैनिक संध्या) : आधी केले मग सांगितले हे ब्रीद सत्यात उतरवणारे येथील नगरसेवक शशिकांत जाधव यांच्या पाठ पुराव्यामुळे येथील माणिक चौकातील ब्राह्मणआळी प्रभाग क्रमांक अकरा मध्ये अंगणवाडीचे सुशोभीकरण केल्याने रुपडे पालटले. चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनीषा सुरेशभाऊ गोरे यांच्या हस्ते या अंगणवाडीच्या सुशोभीकरणाचा मोठ्या दिमाखात शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी उपनगराध्यक्षा सुवर्णा राक्षे, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती रुपाली कांडगे, माजी नगरसेविका वृषाली देशमुख, गटनेते व नगरसेवक नितीन गोरे, आरोग्य विभागाचे सभापती मंगेश कांडगे, उद्योजक योगेश देशमुख, अशोक जाधव, युवासेना प्रमुख अभिजीत जाधव, युवासेना उपशहर प्रमुख मयूर भुरूक, मंदार देशमुख, राजेंद्र सुतार, अंगणवाडी सेविका कविता काकडे आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. नगराध्यक्षा मनिषा गोरे यावेळी म्हणाल्या," अंगणवाडीच्या सुशोभीकरणामुळे चिमुकल्यांचा उत्साह द्विगुणित होणार आहे. अंगणवाडीच्या सुशोभीकरणाने रुपडे पालटले असून यासाठी या प्रभागाचे नगरसेवक शशिकांत जाधव, स्मिता जाधव व अभिजीत जाधव आदींनी विशेष योगदान दिले आहे. गावच्या विकासाला गती देण्यासाठी सर्वांनी एकत्र येण्याची गरज आहे." मयूर भूरूक यांनी आभार मानले.

### तंबाखूची पुडी मागण्याच्या बहाण्याने महिलेच्या गळ्यातील दागिने लांबविले

चाकण (दैनिक संध्या) : तंबाखूची पुडी मागण्याचा बहाणा करून खेड तालुक्यातील चास जवळील गुंजवठा फाटा येथे अज्ञात चोरट्यांनी एका वृद्ध महिलेच्या गळ्यातील चार लाख रुपये किमतीचे साडेतीन तोळ्यांचे सोन्याचे दागिने लांबविले. चास जवळ भर दिवसा शुक्रवारी (दि.१९) हा प्रकार घडला. अधिक माहिती अशी की, गुंजवठा फाटा येथील अमोल डेअरी समोर सुभद्रा बबन रासकर या ज्येष्ठ महिलेची टपरी आहे. शुक्रवारी दुचाकी वरून आलेले दोन तरुण टपरी जवळ थांबले. त्यापैकी एकाने खाली उतरून तंबाखूची पुडी मागितली. महिला ग्राहकाला वस्तू देत असतानाच त्याने त्यांच्या गळ्यातील तीन पदरी सोन्याचे मणी असलेली पानपोत व सोन्याचा डोळा असा साडेतीन तोळ्यांचा ऐवज हिसकावून घेत साथीदारासह दुचाकीवरून धूम ठोकली. चोरट्यांनी हिसकावून नेलेल्या सोन्याच्या दागिन्यांची किंमत सुमारे चार लाख रुपये आहे.




### संघर्ष युवा प्रतिष्ठानच्या वतीने शिक्षणासाठी विद्यार्थी दत्तक

जेजुरी (दैनिक संध्या) : ग्रामीण भागातील गरजू होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी गेली 15 वर्षापासून संघर्ष युवा प्रतिष्ठान कार्यरत असून पुरंदर तालुक्यातील कोथळे येथील श्री मल्हार शिक्षण मंडळाच्या विद्या महामंडळ प्रशालेतील दहा विद्यार्थ्यांना दत्तक घेण्यात आले असून त्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. दरवर्षी या प्रतिष्ठानच्या वतीने दहा विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी दत्तक घेण्यात येते,शालेय महाविद्यालयीन शिक्षणा बरोबरच नोकरीसाठी मार्गदर्शन करण्यात येते.विद्यार्थ्यांना सर्व प्रकारचे शैक्षणिक साहित्य, स्कूल बॅग, गणवेश, शैक्षणिक फी देण्यात येते. विद्यालयात आयोजित कार्यक्रमावेळी प्रतिष्ठानचे संस्थापक ज्ञानेश्वर जगताप, संचालक ॲड. सौ. संगीता भोईटे,लक्ष्मण जगताप, सार्थक मनोज जगताप यांच्या हस्ते ही शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी श्री मल्हार शिक्षण मंडळाचे सचिव विजय जगताप, सहसचिव राजेंद्र जगताप खजिनदार तुषार खैरे, मुख्याध्यापक प्रशांत कदम व पालक उपस्थित होते.

### भीमाशंकर मंदिरात विनापास दर्शन पुन्हा सुरु

मंचर (दैनिक संध्या) : सुमारे पाच महिन्यांनंतर श्रीक्षेत्र भीमाशंकर मंदिरात भाविकांसाठी विनापास दर्शन व्यवस्था गुरुवार (दि. १८) पासून पुन्हा सुरू करण्यात आली आहे. जिल्हा प्रशासनाच्या निर्देशानुसार सकाळी ७ ते ११ या वेळेत भाविकांना थेट दर्शनाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या निर्णयामुळे भाविकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, मंदिर परिसरातील गर्दीत लक्षणीय वाढ झाली आहे. श्रीक्षेत्र भीमाशंकर मंदिर परिसरात विविध विकासकामे सुरू असल्याने दर्शन व्यवस्थापन आणि सुरक्षा राखणे हे प्रशासनासमोर मोठे आव्हान ठरत आहे. विशेषतः समामंडप उभारणीसाठी बसविण्यात आलेले लोखंडी पाइप, बांधकाम साहित्य आणि मर्यादित जागा यामुळे गर्दीचे नियोजन अधिक काळजीपूर्वक करावे लागत आहे. विनापास दर्शनाची माहिती मिळताच राज्यासह देशातील विविध भागांतून आलेल्या भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावल्याचे चित्र दिसून येत आहे. स्थानिक ग्रामस्थ, देवस्थान ट्रस्ट आणि प्रशासन यांच्या समन्वयातून दर्शन व्यवस्था सुरळीत ठेवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. भाविकांच्या सुरक्षिततेसह वाहतूक, रांगांचे नियोजन आणि मंदिर परिसरातील शिस्त यावर विशेष भर दिला जात आहे. आगामी शनिवार, रविवार तसेच धार्मिक उत्सवांच्या काळात गर्दी आणखी वाढण्याची शक्यता असल्याने अतिरिक्त उपाययोजनांची आवश्यकता व्यक्त होत आहे. भाविकांनी प्रशासनाला सहकार्य करून शिस्तबद्ध पद्धतीने दर्शन घ्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे. सुरक्षित आणि सुरळीत दर्शन व्यवस्था राखण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणा सज्ज असल्याची माहिती प्रशासनाने दिली.



# आषाढी पालखी सोहळ्यासाठी आळंदीत पूर्वतयारीला वेग

## ३० जूनपर्यंत सर्व कामे पूर्ण करण्याचे निर्देश

आळंदी (दै. संध्या)

आषाढी यात्रा पालखी प्रस्थान सोहळा २०२६ च्या पार्श्वभूमीवर आळंदी येथे पूर्वनियोजन बैठकीत विविध विभागांना आवश्यक कामे वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

उपविभागीय अधिकारी खेड अनिल दौंडे यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक नगरपरिषद सभागृहात पार पडली. बैठकीस नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, उपनगराध्यक्षा सुजाता तापकीर, यात्रा सभापती पूजा संजय घुंडरे, मुख्याधिकारी माधव खांडेकर, आळंदी देवस्थानचे विश्वस्त चैतन्य महाराज कबीरबूवा, पुरुषोत्तम महाराज पाटील, पोलीस प्रशासन, आरोग्य, सार्वजनिक बांधकाम, विद्युत, परिवहन, पाटबंधारे, अन्न व औषध प्रशासन तसेच विविध विभागांचे अधिकारी व लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

मुख्याधिकारी खांडेकर यांनी आषाढी वारीसाठी करण्यात येणाऱ्या नियोजनाची माहिती देताना नगरपरिषदेकडून १७ अधिकारी, २०० कर्मचारी, १५० स्वयंसेवक, पिण्याच्या पाण्यासाठी १५ टँकर्स, २० सक्शन मशीन, अग्निशमन वाहने, रेस्क्यू बोर्ड तसेच इतर यंत्रणा उपलब्ध करून दिली जाणार असल्याचे सांगितले.

यंदा वारीसाठी शहरात १८०० मोबाईल टॉयलेट आणि सार्वजनिक शौचालयांतील ६०० आसनांची व्यवस्था करण्यात येणार आहे. शहरात धूर फवारणी, स्वच्छता मोहीम, नदीघाट स्वच्छता, जलवाहिन्यांची दुरुस्ती, पाणीपुरवठा व्यवस्थापन आणि सीसीटीव्ही नियंत्रण व्यवस्था उभारण्यात येणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले. विद्युत विभागाने वारीदरम्यान अखंडित वीजपुरवठ्यासाठी विशेष नियोजन केले असून दोन स्वतंत्र उपकेंद्रांद्वारे शहराला वीजपुरवठा करण्यात येणार आहे. उर्वरित विद्युत कामे १ जुलैपूर्वी पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. आरोग्य विभागाकडून ग्रामीण रुग्णालयात अतिरिक्त बेड, ऑक्सिजन सुविधा, रुग्णवाहिका आणि वैद्यकीय पथके सज्ज ठेवण्याचे नियोजन करण्यात आले आहे. धर्मशाळा व मठांतील पाण्याच्या नमुन्यांची तपासणीही केली जाणार आहे.

पोलीस प्रशासनाकडून वारी बंदोबस्तासाठी १५० अधिकारी आणि ९९० पोलीस कर्मचारी नियुक्त करण्यात येणार असून हरवलेल्या लहान मुलांसाठी व ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र यंत्रणा उभारण्यात येणार आहे. वाहतूक व्यवस्थेसाठी विविध ठिकाणी थांबा बिंदू तसेच पार्किंगची स्वतंत्र व्यवस्था करण्यात येणार आहे. बैठकीत लोकप्रतिनिधींनी महिलांसाठी पिंक टॉयलेट, नदीघाटावर हिरकणी कक्ष, मंदिर परिसरातील अतिक्रमण हटविणे, प्रकाशव्यवस्था, रस्ते दुरुस्ती आणि स्वच्छता यावर भर देण्याची मागणी केली.

अध्यक्षीय समारोपात उपविभागीय अधिकारी अनिल दौंडे यांनी सर्व विभागांनी समन्वयाने काम करून ३० जून २०२६ पर्यंत सर्व कामे पूर्ण करण्याचे निर्देश दिले. तसेच त्रुटी राहू नयेत आणि वारकऱ्यांना सुरक्षित व सुकर सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी विशेष दक्षता घेण्याचे आवाहन केले.



## योग दिनानिमित्त साबळे कॉलेज ऑफ फार्मसीत जनजागृती कार्यक्रम

सासवड (दै. संध्या)

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या शेठ गोविंद रघुनाथ साबळे कॉलेज ऑफ फार्मसी अँड पॉलिटेक्निक, सासवड येथे आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त उत्साहपूर्ण वातावरणात विशेष योग व आरोग्य जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक, मानसिक व भावनिक स्वास्थ्याबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

यंदाच्या आंतरराष्ट्रीय योग दिनाची संकल्पना "Yoga for One Earth, One Health" ही असून त्यानिमित्त विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व, निरोगी जीवनशैली आणि तणावमुक्त जीवनासाठी योगाची उपयुक्तता याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.



कार्यक्रमासाठी आर्ट ऑफ लिव्हिंगचे फॅसिलिटेटर श्री. हृषीकेश शाह हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. त्यांनी योग, प्राणायाम, ध्यान आणि सकारात्मक विचारसरणी यांचे महत्त्व पटवून देत विद्यार्थ्यांना विविध योगासने व श्वसनक्रियांचे प्रात्यक्षिक करून दाखविले. नियमित योगाभ्यासामुळे शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच मानसिक एकाग्रता, आत्मविश्वास आणि कार्यक्षमता वाढण्यास मदत होते, असे त्यांनी सांगितले. प्राचार्या डॉ. राजश्री चव्हाण यांनी विद्यार्थ्यांनी निरोगी व संतुलित जीवनासाठी नियमित योगाभ्यासाचा अंगीकार करावा, असे आवाहन केले. तर उपप्राचार्या डॉ. स्मिता पवार यांनी योगामुळे मानसिक स्वास्थ्य, एकाग्रता आणि सकारात्मकता वृद्धिंगत होत असल्याचे सांगितले. या कार्यक्रमास महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. राजश्री चव्हाण, पॉलिटेक्निक विभागाच्या प्राचार्या विशाखा गायकवाड, उपप्राचार्या डॉ. स्मिता पवार, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. शेवटी सर्वांनी नियमित योगाभ्यास करण्याचा संकल्प करून निरोगी जीवनाचा संदेश दिला.

## नसरापूर चिमुकली हत्या प्रकरणात मोठी घडामोड; आरोपीची सीसीटीव्हीवर कबुली

नसरापूर (दै. संध्या)

नसरापूर येथील तीन वर्षीय चिमुकलीचे अपहरण, लैंगिक अत्याचार व हत्या प्रकरणात न्यायालयात सादर केलेल्या सीसीटीव्हीत दिसणारा व्यक्ती मीच आहे, अशी कबुली आरोपी भीमराव कांबळेने शुक्रवारी (दि. १९) न्यायालयात दिली. सुरुवातीला सीसीटीव्ही फुटेज दाखवल्यानंतर ते नाकारणाऱ्या कांबळेला सर्व फुटेज सहा ते सात वेळा झूम करून दाखवले. अखेर, त्याने ती व्यक्ती आपणच असल्याचे सांगितले. परंतु, सीसीटीव्हीमध्ये दिसणारी चिमुकली कोण हे माहीत नसल्याचे सांगून स्वतःचा बचाव करण्याचा प्रयत्न केला.

शुक्रवारी सकाळी ११ वाजता पोलिस बंदोबस्तात कांबळेला विशेष न्यायाधीश एस. आर. साळुंखे यांच्या न्यायालयात हजर केले. 'भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३' च्या कलम ३५१ अन्वये त्याचा जबाब नोंदविण्यात आला. न्यायालयाने मराठी भाषेत ५५ साक्षीदारांचे पुरावे समजावून सांगत कांबळेला ८८ प्रश्न विचारले. यादरम्यान, सीसीटीव्ही फुटेजमध्ये आरोपीसोबत एक लहान मुलगी घटनास्थळाकडे जाताना आणि काही वेळाने आरोपी एकटाच परतताना दिसत असल्याबाबत न्यायालयाने आरोपीकडे विचारणा केली. गुन्हा दाखल झाल्यापासून अवघ्या १६ दिवसांत ५५ साक्षीदारांच्या साक्षी नोंदवित त्यांचा उलटतपास पूर्ण केला आहे. तसेच ३५५ पेक्षा जास्त कागदपत्रे न्यायालयात सरकार पक्षाने सादर केली.

## शिरूर आठवडे बाजारात पोलिसांचे विशेष पेट्रोलिंग; वाहतूक नियमभंग करणाऱ्यांवर कारवाई

कवठे येमाई (दै. संध्या)

शनिवार दि. 20 जून ला शिरूर शहरातील मार्केट यार्ड येथे भरलेल्या आठवडे बाजाराला आज सकाळी १० ते ११ च्या दरम्यान शिरूर पोलिसांनी भेट देत सुरक्षा आणि कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी विशेष पेट्रोलिंग केले.

दर शनिवारी भरणाऱ्या या बाजारात शिरूर शहरासह पंचक्रोशीतील नागरिक तसेच अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीगोंदा व पारनेर तालुक्यातील शेतकरी व ग्राहक मोठ्या संख्येने खरेदी-विक्रीसाठी येत असल्याने परिसरात मोठी गर्दी होत असते. यामुळे मोबाईल चोरी, दागिने चोरी व इतर मालमत्तेविरुद्ध गुन्हे घडण्याची शक्यता लक्षात घेऊन शिरूर पोलिस स्टेशनचे



प्रभारी पोलीस अधिकारी विनोद पाटील व पोलीस कर्मचाऱ्यांनी बाजार परिसरात गस्त घातली.

यावेळी पोलिसांनी शेतकरी व नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या समस्या व अडचणी जाणून घेतल्या. प्राप्त सूचना व तक्रारींबाबत आवश्यक उपाययोजनांसाठी मार्केट यार्ड प्रशासनाला लेखी पत्र देण्याची कार्यवाही करण्यात येणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

शनिवारी शिरूरच्या बाजाराच्या दिवशी वाहनांची वाढती संख्या लक्षात घेऊन वाहतूक कोंडी व पार्किंग व्यवस्थापनासाठी शिरूर नगरपालिकेशी समन्वय साधून उपाययोजना करण्याबाबत चर्चा सुरू असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली.

## एमएसबीटीई उन्हाळी २०२६ परीक्षेत साबळे कॉलेज ऑफ फार्मसीच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

सासवड (दै. संध्या)

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या शेठ गोविंद रघुनाथ साबळे कॉलेज ऑफ फार्मसी (पॉलिटेक्निक व डिग्री), सासवड येथील विद्यार्थ्यांनी एमएसबीटीई उन्हाळी २०२६ परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करून महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे. या परीक्षेत द्वितीय वर्ष डी.फार्मचा निकाल शंभर टक्के लागला असून विद्यार्थ्यांनी गुणवत्तायादीतही आपला ठसा उमटविला आहे. प्रथम वर्ष डी.फार्म (डिग्री) विभागामध्ये सलोनी हनुमंत निंबाळकर हिने ८४.५० टक्के गुणांसह प्रथम क्रमांक पटकाविला. प्रीती त्र्यंबक जप्ताप हिने ८१.१० टक्के गुणांसह द्वितीय, तर संजना देवदास साबळे हिने ७९.५० टक्के गुणांसह तृतीय क्रमांक मिळविला.

द्वितीय वर्ष डी.फार्म (डिग्री) विभागातून वंदना बाळासाहेब गरुड हिने ८७.३६ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक मिळविला. दिशा विजय कुंभारकर हिने ८५.२७ टक्के गुणांसह द्वितीय, तर ईशा विजय कुंभारकर हिने ८४.८२ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक प्राप्त केला.

महाविद्यालयाच्या पॉलिटेक्निक विभागातील विद्यार्थ्यांनीही उल्लेखनीय कामगिरी नोंदविली. प्रथम वर्ष डी.फार्ममध्ये श्रेया संतोष पोमन (८५.१०%), वैष्णवी वैभव कुंभार (८२.५०%) आणि श्रुतिका सोमनाथ वाचकल (८१.५०%) यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविला. द्वितीय वर्ष डी.फार्ममध्ये प्रांजल शेखर कांबळे (८५.३६%), मानसी नंदकुमार कुंजीर (८५.००%) आणि मानसी बाबू धुमाळ (८४.१८%) यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त केला.

विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्या डॉ. राजश्री चव्हाण, उपप्राचार्या डॉ. स्मिता पवार, पॉलिटेक्निक विभागाच्या प्राचार्या विशाखा गायकवाड तसेच सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम, शिस्तबद्ध अभ्यास आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांच्या बळावर हे यश संपादन केल्याचे त्यांनी नमूद केले. महाविद्यालयाच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणपद्धतीचे आणि विद्यार्थ्यांच्या जिद्दीचे हे यश प्रतीक असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

## सतीशभैया कल्याणकारी संघाच्यावतीने एसटी स्मार्ट कार्ड काढण्यासाठी शिबिराचे आयोजन

बारामती (दै. संध्या)

निंबुत येथे सतीश भैय्या कल्याणकारी संघ यांच्या वतीने निंबुत गावातील बारा वर्षावरील मुली,व महिलांसाठी एसटी बसच्या तिकिटामध्ये सवलत मिळण्याकरिता लागणारा पास काढण्याचे शिबिर बाबा कमल सभागृह निंबुत येथे आज सायंकाळी सहा वाजता सुरू करण्यात आले.

कल्याणकारी संघाच्या वतीने अगदी माफक दरामध्ये म्हणजे शंभर रुपयांमध्ये हा पास काढून देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.पास काढण्यासाठी पुढील दोन दिवस ही यंत्रणा गावामध्ये असणार आहे. गरजवंतांनी या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन संघाचे अध्यक्ष श्री. सतीशराव काकडे यांनी केले आहे.

बाहेर हे कार्ड काढण्यासाठी जवळपास 200 ते 250 रुपये खर्च येतो,मात्र राहिलेले दीडशे



रुपये सोमेश्वर चे संचालक श्री.अभिजीत काकडे यांनी स्वतः उपलब्ध करून दिले.

या कार्यक्रमासाठी कल्याणकारी संघाचे सचिव मदनराव काकडे, विक्रम काकडे, अमोल काकडे, मधुकर बनसोडे, योगीराज काकडे, भरत काकडे, रुपेश काकडे, जुमन सय्यद, विकास जाधव, विजय पवार, वैभव जाधव, धनंजय काकडे, गणेश फरांदे, राजू काळे यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी आलेल्या महिलांनी व ग्रामस्थांनी कल्याणकारी संघाचे अध्यक्ष सतीश काकडे व सोमेश्वरचे संचालक अभिजीत काकडे यांचे आभार मानले. बारामती तालुक्यामध्ये कदाचित शंभर रुपयांमध्ये कार्ड काढून देणारे निंबूत हे पहिलेच गाव असावे अशा भावना उपस्थित महिलांनी व्यक्त केल्या.

## दौंड गर्भलिंग निदान रॅकेट प्रकरणात अण्णासाहेब गिरीच्या मालमत्तांवर संशयाचे सावट


दौंड (दै. संध्या)

दौंड तालुक्यात गाजत असलेल्या बेकायदेशीर गर्भलिंग निदान आणि गर्भपात प्रकरणाने राज्यभर खळबळ उडवली असतानाच या प्रकरणातील कथीत मुख्य सूत्रधार अण्णासाहेब गिरी याच्या आर्थिक साम्राज्याबाबत नवे प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत. गिरीने अल्पावधीत उभारलेल्या कोट्यवधी रुपयांच्या मालमत्ता आणि त्यामागील आर्थिक स्रोत याबाबत मोठ्या प्रमाणात चर्चा सुरू असून, त्याच्या या 'सोनेरी लंके' ला नेमके कोणाचे राजकीय संरक्षण मिळाले होते, याचीही उत्सुकता वाढली आहे. स्थानिक स्तरावर सुरू असलेल्या चर्चांनुसार, गिरीने अहिल्यानगर आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करून ही' सोनेरी लंका' उभारली आहे. अनेक व्यावसायिक मालमत्ता यामध्ये असल्याचा दावा केला जात आहे. विशेषतः पारनेर एमआयडीसी आणि वाळुंज एमआयडीसी परिसरात उभारलेल्या काही व्यावसायिक इमारतींशी त्याचा संबंध असल्याच्या चर्चा सुरू आहेत.

याशिवाय, अहिल्यानगर जिल्ह्यातील एका प्रभावशाली राजकीय नेत्याशी गिरीचे निकटचे संबंध असल्याची चर्चा परिसरात रंगू लागली आहे. त्या नेत्याच्या कथीत पाठबळावरच गिरीने आपली ही 'सोन्याची लंका' उभारून आपले आर्थिक जाळे विस्तारल्याचा दावा काही स्तरांतून केला जात आहे. कोविड काळात त्या नेत्याच्या सांगण्यावरून गिरीने लाखो रुपयांच्या देणग्या दिल्याचीही चर्चा सुरू असून, या आर्थिक व्यवहारांची चौकशी झाल्यास काही महत्त्वाचे धागेदोरे समोर येऊ शकतात, असे बोलले जात आहे. दरम्यान, गिरीच्या आर्थिक व्यवहारांमागील निधीचा स्रोत, मालमत्तांची उभारणी, कथीत गुंतवणूक आणि संभाव्य राजकीय संबंध यांची सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.




दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



# थोडक्यात पण महत्वाचे




## ऑनलाईन स्व-नामांकन सादर करण्याचे आवाहन

मुंबई (दैनिक संध्या) : केंद्र सरकारच्या शिक्षण मंत्रालयामार्फत दिल्या जाणाऱ्या राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार- २०२६ साठी ऑनलाईन स्व-नामांकन प्रक्रियेस प्रारंभ झाला असून राज्यातील पात्र शिक्षकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन शिक्षण संचालनालयाने केले आहे. शिक्षण संचालनालयाने दिलेल्या माहितीनुसार, राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारासाठी स्व-नामांकन प्रक्रिया दि. १५ जून २०२६ पासून सुरू झाली आहे. राज्यातील शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा तसेच मान्यताप्राप्त अनुदानित खाजगी प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षकांना या पुरस्कारासाठी अर्ज करता येणार आहे. पात्र शिक्षकांनी https://nationalawardstoteachers.education.gov.in या वेबपोर्टलवर दि. १० जुलै २०२६ पर्यंत स्व-नामांकन नोंदवावे. तसेच अर्जदारांनी आपले स्व-नामांकन अंतिम करून दि. १३ जुलै २०२६ पर्यंत ऑनलाईन सादर करणे आवश्यक आहे. राज्यातील अधिकाधिक पात्र शिक्षकांनी राष्ट्रीय स्तरावरील या प्रतिष्ठेच्या पुरस्कारासाठी अर्ज करून आपल्या शैक्षणिक कार्याची दखल राष्ट्रीय पातळीवर घेण्यासाठी ही संधी साधावी, असे आवाहन शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) डॉ. महेश पालकर यांनी केले आहे.

## विद्यार्थ्यांसाठी समुपदेशन सेवा उपलब्ध

मुंबई (दैनिक संध्या) : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत जून-जुलै २०२६ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इयत्ता दहावी) आणि उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता बारावी) पुरवणी परीक्षांच्या कालावधीत विद्यार्थ्यांना मानसिक आधार व मार्गदर्शन मिळावे यासाठी विविध स्तरांवर समुपदेशन सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. राज्य मंडळाच्या माहितीनुसार, दहावीची पुरवणी परीक्षा दि. ३० जून २०२६ पर्यंत, तर बारावीची पुरवणी परीक्षा दि. ८ जुलै २०२६ पर्यंत पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण विभागीय मंडळांमार्फत आयोजित करण्यात आली आहे. परीक्षा काळात विद्यार्थ्यांना ऑनलाईन समुपदेशन सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य मंडळ स्तरावर समुपदेशकांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांच्याशी ७२०८४२९३८१, ९४०४७८३९९६ आणि ९९६०६४४४११ या भ्रमणध्वनी क्रमांकांवर संपर्क साधता येणार आहे.

## सूचना आणि अभिप्राय पाठविण्याचे आवाहन

मुंबई (दैनिक संध्या) : राज्यातील एकल महिलांना सन्मानपूर्वक, सुरक्षित आणि स्वावलंबी जीवन जगता यावे, यासाठी स्वतंत्र धोरण तयार करण्यात येत आहे. हे धोरण अधिक व्यापक, लोकाभिमुख आणि परिणामकारक करण्यासाठी राज्यातील एकल महिला, नागरिक, स्वयंसेवी संस्था, सामाजिक कार्यकर्ते, अभ्यासक, संशोधक आणि विषयतज्ज्ञ यांनी आपल्या सूचना व अभिप्राय ८२०८५८९१९५ या व्हॉट्सअॅप क्रमांकावर पाठवावेत, असे आवाहन मुंबई उपनगर जिल्ह्याचे महिला व बालविकास अधिकारी शरद कुऱ्हाडे यांनी केले आहे. एकल महिलांसमोरील समस्या केवळ मांडण्याऐवजी त्या सोडविण्यासाठी शासनाने कोणत्या ठोस उपाययोजना कराव्यात, कोणत्या नवीन योजना सुरू कराव्यात; तसेच विद्यमान योजनांमध्ये, कायद्यांमध्ये किंवा नियमांमध्ये कोणते बदल आवश्यक आहेत, याबाबत सविस्तर सूचना पाठविण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अभिप्राय पाठविताना केवळ मत नोंदविण्याऐवजी संबंधित विषयाची पार्श्वभूमी, सुचविलेली उपाययोजना, संभाव्य लाभार्थी आणि अपेक्षित परिणाम यांचा समावेश असलेला सुस्पष्ट प्रस्ताव सादर करावा, असेही आवाहन करण्यात आले आहे. एकल महिलांसाठी तयार होणारे धोरण अधिक प्रभावी आणि सर्वसमावेशक व्हावे, यासाठी समाजातील एकल महिला; तसेच सर्व संबंधित घटकांचा सक्रिय सहभाग महत्त्वाचा असल्याचे नमूद करून अधिकाधिक नागरिकांनी या प्रक्रियेत सहभागी व्हावे, असेहीकरण्यात आले आहे.

# एसटीच्या ५,५०० विशेष बसेस

■ मुंबई (दै. संध्या)

पंढरपूरच्या दिशेने निघालेल्या लाखो वारकऱ्यांच्या सेवेसाठी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची एसटी यंदाही सज्ज झाली आहे. आषाढी एकादशी यात्रेनिमित्त राज्यभरातून श्रीक्षेत्र पंढरपूरकडे जाणाऱ्या भाविकांच्या सुरक्षित, सुलभ आणि सुखकर प्रवासासाठी एसटी महामंडळाने 5 हजार 500 विशेष बसेस सोडण्याचे नियोजन केले आहे. राज्यातील कोणत्याही गावातून 40 किंवा त्यापेक्षा अधिक भाविकांनी एकत्रित मागणी केल्यास त्या गावातून थेट पंढरपूरसाठी विशेष एसटी बस उपलब्ध करून दिली जाणार आहे, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

आषाढी यात्रेदरम्यान लाखो वारकरी पालख्यांसह पायी, रेल्वेने, खासगी वाहनांनी आणि एसटीने पंढरपूरकडे प्रस्थान करतात. या भाविकांच्या सेवेला सर्वोच्च प्राधान्य देत एसटी महामंडळाने व्यापक नियोजन केले आहे. भाविकांनी आपल्या जवळच्या एसटी आगाराशी संपर्क साधून विशेष बसची नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. विशेष म्हणजे या विशेष बस सेवेतही शासनाच्या सर्व प्रवासी सवलती कायम राहणार आहेत. 75 वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना 'अमृत ज्येष्ठ नागरिक योजना' अंतर्गत मोफत प्रवास, तर



■ परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

महिलांना 'महिला सन्मान योजना' अंतर्गत तिकीट दरात 50 टक्के सवलत दिली जाणार आहे.

मागील वर्षी आषाढी यात्रेसाठी एसटीने 5,200 विशेष बसेस चालवून तब्बल 21 लाख 95 हजार भाविकांची सुरक्षित ने-आण केली होती. यंदा त्याहून अधिक सक्षम नियोजन करण्यात आले आहे. वारीदरम्यान रात्रंदिवस सेवा बजावणारे चालक, वाहक, यांत्रिक कर्मचारी, पर्यवेक्षक आणि अधिकारी यांच्यासाठी मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्वखर्चाने चहा, नाश्ता आणि भोजनाची व्यवस्था केली आहे. सुमारे 13 हजार कर्मचारी या सुविधेचा लाभ घेणार आहे.

राज्यभरातील भाविकांनी एसटीच्या सुरक्षित, विश्वासार्ह आणि लोकाभिमुख सेवांचा लाभ घेत विठुरायाच्या दर्शनाचा आनंद घ्यावा, असे आवाहन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले आहे. "वारकऱ्यांची सेवा हीच विठ्ठलाची सेवा" या भावनेतून एसटी यंत्रणा संपूर्ण यात्राकाळात अहोरात्र सेवेसाठी तत्पर राहणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

एकादशीच्या दिवशी लाखो भाविक परतीच्या प्रवासाला निघत असल्याने वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी एसटीचे 36 हून अधिक वाहतूक नियंत्रक आणि सुरक्षा रक्षक स्थानिक पोलीस प्रशासनासोबत कार्यरत राहणार आहेत. त्यामुळे वाहतूक नियोजन अधिक प्रभावी होऊन भाविकांचा प्रवास सुलभ होणार आहे.

भाविकांची गर्दी लक्षात घेऊन पंढरपूर येथे चंद्रभागा, भीमा (देगाव), विठ्ठल कारखाना आणि पांडुरंग (आयटीआय महाविद्यालय) अशी चार तात्पुरती बस स्थानके उभारण्यात येणार आहेत. या स्थानकांवर पिण्याचे पाणी, सुलभ शौचालय, संगणकीय आरक्षण केंद्र, चौकशी कक्ष, मार्गदर्शन फलक आणि इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

# माझी वसुंधरा अभियानात लोकसहभाग वाढविण्यावर भर : मंत्री पंकजा मुंडे

■ मुंबई (दै. संध्या)

पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या अंतर्गत असणाऱ्या माझी वसुंधरा अभियान आणि राज्य वातावरणीय बदल कक्षाच्या पुनर्रचनेसंदर्भात पर्यावरण वातावरणीय बदल विभागाच्या मंत्री पंकजा मुंडे यांनी आढावा घेतला. युवक, विद्यार्थी, महिला आणि सामाजिक प्रभावकांचा (इन्फ्लुएन्सर्स) मोठ्या प्रमाणावर सहभाग वाढविण्यावर भर द्यावा. तसेच जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत हवामान कृती आराखड्यांवर नियमित चर्चा व्हावी तसेच मंत्रिमंडळ बैठकीत दरमहा हवामान बदल विषयाचा आढावा घेण्यासंदर्भात पुढाकार घेणार असल्याचे यावेळी मंत्री मुंडे यांनी सांगितले. यावेळी विभागाच्या सचिव जयश्री भोज, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव राहुल रेखावार, उपसचिव जॉय ठाकूर आदी उपस्थित होते. मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या की, माझी वसुंधरा अभियान अधिक प्रभावी करण्यासाठी 'वसुंधरा रक्षक' ही संकल्पना प्रभावीपणे राबविण्यात यावी. पर्यावरण संवर्धनासाठी काम करणाऱ्या प्रत्येक नागरिकाला 'वसुंधरा रक्षक' म्हणून सहभागी करून घ्यावे. तसेच या अभियानात नागरिकांचा सहभाग वाढविण्यासाठी सोशल मीडियासारखे स्वतंत्र व्यासपीठ विकसित करण्यात यावे. तसेच माझी वसुंधरा स्पर्धेतील मूल्यांकन पद्धत सुधारण्याची आवश्यकता असून



मूल्यांकन पद्धतीत लोकसंख्येऐवजी प्रदूषणाचा निकष अधिक महत्त्वाचा असावा. त्यामध्ये नागरिकांनी केलेल्या वृक्षारोपण, पाणी पुनर्वापर, कापडी पिशव्यांचा वापर, सायकलिंग, नैसर्गिक शेती आदी पर्यावरणपूरक उपक्रमांना गुणांकनास प्राधान्य द्यावे. डोंगराळ, ग्रामीण आणि औद्योगिक भागातील स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन गुणांकन प्रणाली विकसित करण्याची गरज मंत्री मुंडे यांनी व्यक्त केली. नैसर्गिक शेती, रासायनिक खतांचा कमी वापर, मृदासंवर्धन, वृक्षारोपण, धूरमुक्त व धूळमुक्त गावे, पाण्याचा पुनर्वापर आणि अक्षय ऊर्जेचा वापर यांसारख्या बाबींना अभियानात विशेष प्राधान्य देण्याचे निर्देशही मंत्री मुंडे यांनी दिले. राज्य वातावरणीय बदल कक्षाच्या पुनर्रचनेसंदर्भात स्वतंत्र आणि सक्षम यंत्रणा उभारण्याबाबत यावेळी चर्चा झाली. हवामान बदलाशी संबंधित धोरण आखणी, जनजागृती, प्रकल्प व्यवस्थापन, हवामान कृती आराखड्यांचे मूल्यमापन आणि हवामान वित्तपुरवठा यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारण्यासंदर्भात यावेळी चर्चा झाली.

# शालेय शिक्षण विभाग आणि गुगल दरम्यान कृत्रिम बुद्धिमत्ता प्रशिक्षणासाठी करार



■ मुंबई (दै. संध्या)

राज्यातील शिक्षकांना कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डिजिटल तंत्रज्ञानाचे प्रगत प्रशिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी शालेय शिक्षण विभाग आणि गुगल फॉर एज्युकेशन यांच्यादरम्यान उद्देशपत्रावर स्वाक्षरी करण्यात आली. या उपक्रमाअंतर्गत पुढील दीड वर्षांच्या कालावधीत राज्यातील चार लाखांहून अधिक शिक्षकांना 'गुगल एआय एज्युकेटर सिरीज' अंतर्गत प्रशिक्षण देण्यात येणार आहे. शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील त्यांच्या कार्यालयात आयोजित कार्यक्रमात गुगल फॉर एज्युकेशन विभागाचे उपाध्यक्ष ख्रिस फिलिप्स, तर शालेय शिक्षण विभागाच्या वतीने सहसचिव ताशीलदार यांनी उद्देशपत्रावर स्वाक्षरी केली. यावेळी बोलताना शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी सांगितले की, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डिजिटल तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षकांना आधुनिक कौशल्यांनी सुसज्ज करणे ही काळाची गरज आहे. या कराराअंतर्गत टप्प्याटप्प्याने शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात येणार असून प्रारंभी निवडक मास्टर ट्रेनर्सना प्रशिक्षण दिले जाईल. त्यानंतर हे प्रशिक्षित शिक्षक राज्यभरातील

■ राज्यातील चार लाख शिक्षकांना मिळणार लाभ

इतर शिक्षकांना प्रशिक्षण देतील. या माध्यमातून राज्यातील प्रत्येक शाळेपर्यंत कृत्रिम बुद्धिमत्तेवरील प्रशिक्षण पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे या उपक्रमासाठी राज्य शासनावर कोणताही आर्थिक भार पडणार नसून संपूर्ण प्रशिक्षण गुगलमार्फत विनामूल्य उपलब्ध करून दिले जाणार आहे. शिक्षकांच्या डिजिटल सुरक्षिततेची काळजी घेण्यात आली असून या संपूर्ण प्रक्रियेवर महाराष्ट्र शासनाचे नियंत्रण राहणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी सांगितले की, 21व्या शतकात शिक्षण क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचे महत्त्व झपाट्याने वाढत आहे. शासकीय तसेच अनुदानित शाळांमधील शिक्षकांना जागतिक दर्जाच्या संस्थेकडून प्रशिक्षण मिळावे, अशी विभागाची अपेक्षा होती. गुगल फॉर एज्युकेशन सोबत झालेल्या या सहकार्यामुळे राज्यातील लाखो शिक्षकांना अत्याधुनिक प्रशिक्षणाचा लाभ मिळणार आहे.

# 'जय महाराष्ट्र' मध्ये प्रा. मृदुला दाढे यांची विशेष मुलाखत

### भारतीय संगीत परंपरेचा समृद्ध वारसा, इतिहास आणि डिजिटल युगातील आव्हानांचा सखोल वेध

■ मुंबई (दै. संध्या)

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात मुंबई विद्यापीठाच्या प्राध्यापिका तथा ज्येष्ठ संगीत अभ्यासक प्रा. मृदुला दाढे यांची विशेष मुलाखत प्रसारित होणार आहे. भारतीय शास्त्रीय, सुगम, लोकसंगीत आणि चित्रपट संगीताचा समृद्ध वारसा, त्याचा ऐतिहासिक प्रवास, समाजजीवनाशी असलेले नाते तसेच डिजिटल युगातील संगीत क्षेत्रासमोरील संधी आणि आव्हाने या विविध विषयांचा सखोल उहापोह या मुलाखतीत करण्यात आला आहे.

'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात ही मुलाखत मंगळवार, 23 जून 2026 रोजी रात्री 8.00 वाजता दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवर प्रसारित होणार असून महासंचालनालयाच्या या विविध समाजमाध्यमांवरही ती उपलब्ध होणार आहे. या



मुलाखतीचे निवेदन सुषमा जाधव यांनी केले आहे.

संगीताचा इतिहास, परंपरा आणि समाजजीवनाशी असलेल्या त्याच्या घट्ट नात्याचा अभ्यास करणाऱ्या प्रा. दाढे यांनी या मुलाखतीत भारतीय संगीताच्या उत्क्रांतीचा प्रवास रसिकांसमोर उलगडला आहे. विविध घराणी, संगीत परंपरा आणि गुरू-शिष्य परंपरेचे जतन व संवर्धन यांचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले आहे. तसेच भाषा आणि संगीत यांच्यातील अतूट संबंध स्पष्ट करत संस्कृतपासून आधुनिक भारतीय भाषांच्या विकासात संगीताने बजावलेली भूमिका त्यांनी अभ्यासपूर्ण पद्धतीने विशद केली आहे.

शब्द, सूर आणि लय यांच्या सुंदर संगमातून मानवी भावविश्व कसे समृद्ध होते, यावर भाष्य करताना त्यांनी संगीताच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि भावनिक पैलूंवर प्रकाश टाकला आहे. चित्रपट संगीत आणि शास्त्रीय संगीत यांचा परस्परसंबंध, लोकसंगीतातून मिळणारी सर्जनशील प्रेरणा, ग्रामीण व शहरी समाजातील संगीताचे स्थान तसेच आधुनिक तंत्रज्ञानामुळे संगीत क्षेत्रात निर्माण झालेल्या नव्या संधी आणि आव्हानांवरही त्यांनी सविस्तर विवेचन केले आहे.

याशिवाय, संगीताचा मानसिक आरोग्यावर होणारा सकारात्मक परिणाम, ताणतणाव कमी करण्यातील त्याची प्रभावी भूमिका आणि दैनंदिन जीवनातील संगीताचे महत्त्व याविषयीही प्रा. दाढे यांनी या मुलाखतीत महत्त्वपूर्ण माहिती दिली आहे.

# अहवाल सहा महिन्यांत सादर करा : मंत्री पंकजा मुंडे

■ मुंबई (दै. संध्या)

राज्यातील विविध रुग्णालयांतून निर्माण होणाऱ्या जैववैद्यकीय कचऱ्याचे प्रमाण, त्यावरील प्रक्रिया, वैद्यकीय कचरा प्रक्रिया केंद्रांची क्षमता, प्रत्यक्ष कामकाज आणि संबंधित भागातील गरज यांचा सखोल अभ्यास करून सहा महिन्यांत अहवाल सादर करण्याचे निर्देश पर्यावरण, वातावरणीय बदल व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी दिले. वैद्यकीय कचरा प्रक्रिया केंद्रांच्या कामकाजावर नियमित नियंत्रण ठेवण्याबरोबरच विद्यमान धोरणात आवश्यक बदल करण्याची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले. जैव वैद्यकीय कचरा प्रक्रिया केंद्रांबाबतची सद्यस्थिती व अधिकार क्षेत्राच्या पुनर्रचनेसंदर्भात पंकजा मुंडे यांनी आज मंत्रालयीन दालनात बैठक घेतली. यावेळी विभागाच्या सचिव जयश्री भोज, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव राहुल रेखावार, उपसचिव जॉय ठाकूर आदी उपस्थित होते. राज्यातील वैद्यकीय कचरा (बायो-मेडिकल वेस्ट) व्यवस्थापनाची सध्याची स्थिती, उपचार केंद्रांची क्षमता, परवानगी प्रक्रिया आणि देखरेख याबाबत यावेळी आढावा घेण्यात आला. केंद्र शासनाच्या नियमानुसार जैव वैद्यकीय कचऱ्यावर प्रक्रिया केंद्रांना परवाने देताना रुग्णालयांना पर्याय उपलब्ध व्हावेत, स्पर्धात्मक व्यवस्था निर्माण व्हावी आणि सेवा अधिक कार्यक्षम व्हावी. एखाद्या संस्थेवर संपूर्ण अवलंबून राहण्याऐवजी विविध भागांमध्ये पुरेशी प्रक्रिया केंद्रे उपलब्ध असावीत, असे मत मंत्री मुंडे यांनी व्यक्त केले.

# श्री अंबाबाई मंदिराच्या १४४५.९७ कोटींच्या विकास आराखड्याचा शुभारंभ

### मंदिर जतन, वारसा संवर्धन, भाविकांसाठी आधुनिक सुविधा आणि पर्यटन विकासाला चालना देणाऱ्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाची मुहूर्तमेढ

■ कोल्हापूर (दै. संध्या)

केंद्रीय गृहमंत्री तथा सहकार मंत्री अमित शाह यांच्या हस्ते व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आज करवीर निवासिनी श्री अंबाबाई (महालक्ष्मी) मंदिर विकास आराखड्यांतर्गत १४४५.९७ कोटी रुपयांच्या मंदिर जतन, संवर्धन आणि परिसर विकासाच्या विविध कामांच्या कोनशीलेचे अनावरण करून शुभारंभ करण्यात आला.

यावेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री तथा कोल्हापूरचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, सांस्कृतिक कार्य मंत्री अॅड. आशिष शेलार, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील, नगर विकास राज्यमंत्री तथा कोल्हापूर जिल्ह्याच्या सहपालकमंत्री माधुरी मिसाळ, राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष तथा आमदार राजेश क्षीरसागर, महापौर रुपाराणी निकम, खासदार धनंजय महाडिक, आमदार अमल महाडिक, माजी वस्त्रोद्योग मंत्री प्रकाश आवाडे, विशेष पोलीस महानिरीक्षक रंजनकुमार शर्मा, जिल्हाधिकारी तथा पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष डॉ.विजय राठोड,



महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भारूड, पोलीस अधीक्षक निलोत्पल उपस्थित होते.

गृहमंत्री अमित शाह यांनी सपत्नीक श्री अंबाबाईचे दर्शन घेऊन विधिवत पूजा केली. त्यानंतर मंदिर परिसरातील रामाचा पार येथे श्रींच्या उत्सवमूर्तीचे पूजन करण्यात आले. श्रीफळ वाढवून मान्यवरांच्या उपस्थितीत नूतन प्रदक्षिणा मार्ग, परिवार देवता मंदिर संवर्धनासह मुख्य मंदिर जतन, संवर्धन आणि परिसर विकास कामांच्या कोनशीलेचे अनावरण करण्यात आले. यावेळी मंदिर परिसरात उभारण्यात आलेल्या मंदिर आराखडा प्रदर्शनाची माहिती जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड यांनी दिली.

करवीर निवासिनी श्री महालक्ष्मी मंदिर हे भारतातील प्राचीन, जागृत आणि प्रमुख शक्तिपीठांपैकी एक मानले जाते. सुमारे हजार वर्षांहून अधिक इतिहास लाभलेल्या या मंदिराचा उल्लेख विविध पुराणे आणि ऐतिहासिक ग्रंथांमध्ये आढळतो. हेमाडपंथी स्थापत्यशैली, समृद्ध शिल्पकला आणि धार्मिक परंपरांचा अद्वितीय संगम असलेले हे मंदिर देश-विदेशातील लाखो भाविकांच्या श्रद्धेचे केंद्र आहे. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने मंजूर केलेला महालक्ष्मी मंदिर विकास आराखडा हा कोल्हापूरच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक ओळखीला अधिक बळकटी देणारा महत्त्वाकांक्षी उपक्रम ठरत आहे. मंदिर परिसरातील पायाभूत सुविधांचे उन्नतीकरण, वारसा संवर्धन, भाविकांसाठी आधुनिक सोयी-सुविधा आणि पर्यटन विकास या सर्व बाबींचा समन्वय साधत हा आराखडा राबविण्यात येत आहे. विकास आणि वारसा संवर्धन यांचा समतोल राखत राबविण्यात येणाऱ्या या प्रकल्पामुळे मंदिर परिसराचे वैभव अधिक वृद्धिंगत होणार असून भाविकांना अधिक सुलभ, सुरक्षित आणि आधुनिक सुविधा उपलब्ध होणार आहेत.

श्री करवीर निवासिनी महालक्ष्मी अंबाबाई देवस्थान परिसर विकास आराखड्याला ६ मे २०२५ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत एकूण १४४५.९७ कोटी रुपयांच्या निधीस मान्यता देण्यात आली आहे. नियोजन विभागाच्या २८ ऑगस्ट २०२५ च्या शासन निर्णयानुसार या आराखड्याच्या पहिल्या टप्प्यात १४३.९० कोटी रुपयांच्या कामांना मंजुरी मिळाली असून त्यामध्ये पुरातत्त्व विभागाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार मूळ मंदिराचे जतन, संवर्धन आणि दुरुस्तीच्या कामांचा समावेश आहे. सध्या मूळ मंदिराच्या संवर्धनासाठी ३२.९६ कोटी रुपये तसेच मंदिरातील विद्युतीकरण, सीसीटीव्ही आणि लाईटिंगविषयक कामांसाठी २३.०५ कोटी रुपयांची कामे प्रगतीपथावर आहेत. मंदिराचे पुरातन वैभव आणि भव्यता जपण्यासाठी सभोवतालच्या ४१ लहान-मोठ्या मंदिरांचे संवर्धन, नगर प्रदक्षिणा मार्गाचे सुशोभीकरण आणि मंदिर परिसर विकासाची कामेही हाती घेण्यात येणार आहेत. यामुळे धार्मिक पर्यटनाला चालना मिळण्याबरोबरच स्थानिक अर्थव्यवस्थेलाही बळ मिळणार आहे.

या प्रकल्पासाठी एकूण २८,०५८ चौरस मीटर जमिनीचे मूल्यांकन करण्यात आले असून त्यापैकी १९,४८९ चौरस मीटर खाजगी क्षेत्राच्या भूसंपादनाची प्रक्रिया अपर मुख्य सचिव (नगर विकास) यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या मार्गदर्शनाखाली वेगाने सुरू आहे. तीन टप्प्यांत राबविण्यात येणाऱ्या या बृहद विकास आराखड्याअंतर्गत दर्शन मंडप, अन्नछत्र, मंदिर व देवस्थान समिती कार्यालय, स्वतंत्र शौचालय ब्लॉक्स, चप्पल स्टँड, दुकाने, अँफिथिएटर, माहिती केंद्र, सुरक्षा चौकी, मल्टिपर्पज हॉल, पोलीस स्टेशन, प्रथमोपचार केंद्र, वेदपाठशाळा, भोजनगृह आणि मोठ्या प्रमाणावर वाहनतळ उभारण्यात येणार आहेत. केंद्र आणि राज्य शासन धार्मिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारसा जतन करण्यासाठी कटिबद्ध असून हा विकास आराखडा भाविकांना जागतिक दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून देतानाच कोल्हापूरच्या धार्मिक, सांस्कृतिक आणि पर्यटन क्षेत्राच्या विकासाला नवी दिशा देणारा ठरणार आहे. कार्यक्रमास राज्य शासनातील मंत्री, खासदार, आमदार, पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीचे पदाधिकारी तसेच प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### कोथळे हायस्कूल मध्ये विद्यार्थ्यांचे स्वागत

जेजुरी (दैनिक संध्या) : पुरंदर तालुक्यातील कोथळे येथील विद्या महामंडळ प्रशालेतील सर्व विद्यार्थ्यांचे श्री मल्हार शिक्षण मंडळाच्या संचालकांच्या वतीने स्वागत करण्यात आले. शाळेच्या पहिल्या दिवशी संचालक मंडळाच्या वतीने विद्यार्थ्यांचे फुले व शिक्षणिक साहित्यदेऊन स्वागत करण्यात आले. तसेच विद्यालयाचा दहावी इयत्तेचा शंभर टक्के निकाल लागल्याबद्दल सर्व शिक्षकांचे संस्थेच्या वतीने सन्मान करण्यात आला. संस्थेच्या वतीने व ॲड. धनंजय भोईटे यांनी कोथळेची माध्यमिक शाळा ही एक दर्जेदार शिक्षण देणारी संस्था असून त्यातून विद्यार्थ्यांनी चांगले ज्ञान आत्मसात करून एक नवीन पिढी निर्माण करावी असे आवाहन करून या वर्षातील शैक्षणिक अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी विद्यालयाचे संचालक रविंद्र जगताप ॲड. धनंजय भोईटे, राजेंद्र जगताप, विजय जगताप, प्रमोद जगताप, तुषार खेरे, सतीश शिंदे विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रशांत कदम तसेच माजी विद्यार्थी संघाचे आकाश शिळीमकर, योगेश जगताप विद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेतरकर्मचारी उपस्थित होते.

### जेजुरी पोलिस स्टेशनची मटका जुगार अड्ड्यावर छापेमारी

जेजुरी (दैनिक संध्या) : जेजुरी पोलीस स्टेशनचे नव्याने रुजू झालेले पोलीस निरीक्षक रवींद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जेजुरी पोलीस स्टेशन हद्दीत चालणाऱ्या बेकायदेशीर मटका जुगार अड्डयांवर छापेमारी करून कारवाई करण्यात आली आहे. या छापेमारीत पाच जणांवर कारवाई करण्यात आली. याबाबत जेजुरी पोलीस स्टेशनकडून मिळालेल्या माहितीनुसार जेजुरी शहरातील आठवडे बाजार पटांगण,जेजुरी शहर,जेजुरी रेल्वे स्टेशन व मावडी परिसरात बेकायदेशीर चालणाऱ्या मटका जुगार अड्डयांवर छापेमारी करून 5 आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर छापेमारीत 12545/- रु. मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी सरकार तर्फे फिर्याद दाखल करण्यात आली आहे. त्यानुसार विलास श्रीपती गजाकस (वय ६३ वर्षे), रा. jजुनी जेजुरी, संजय सिताराम भोसले (वय ५३ वर्षे), रा. शिवाजी चौक, जेजुरी) आणि सचिन अंकुश बोडरे (वय ३७ वर्षे), रा. सासवड, ता. पुरंदर, परशुराम गंगाराम खोमणे (वय ३२ वर्षे) रा. मावडी क.प. तात्याबा गायकवाड (वय 37 वर्षे) रा. जेजुरी रेल्वे स्टेशन, यांच्याविरुद्ध महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२ (अ) अन्वये गुन्हा (रजि. नं. १५९/२०२६) दाखल करण्यात आला आहे. जेजुरी पोलीस स्टेशनच्या हद्दीत कोणताही अवैध बेकायदेशीर धंदे चालू देणार नाही, अशा धंद्यांवर कडक कायदेशीर कारवाई करणार असल्याचे पोलीस निरीक्षक रवींद्र पाटील यांनी सांगितले.

### शिवसेना वर्धापन दिनानिमित्त जुन्नरमध्ये विद्यार्थ्यांना वह्या व शालेय साहित्याचे वाटप

जुन्नर (दैनिक संध्या) : शिवसेनेच्या वर्धापन दिनानिमित्त तसेच हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने जुन्नर शहरातील जुन्नर नगर परिषदेच्या सर्व शाळांमध्ये व मूकबधिर विद्यालय, जुन्नर येथील विद्यार्थ्यांना वह्या व शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना बाळासाहेब ठाकरे यांच्या जीवनकार्य, विचार आणि सामाजिक योगदानाविषयी प्रश्न विचारण्यात आले. योग्य उत्तरे देणाऱ्या विद्यार्थ्यांना विशेष भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले.या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. यावेळी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उपजिल्हाप्रमुख अँड. जयराम शेठ तांबे, तालुकाप्रमुख भास्करशेठ गाडगे, ज्येष्ठ वकील अँड. उल्हासजी तांबे, उपतालुका प्रमुख ह.भ.प. धोंडीभाऊ पानसरे, उपनगराध्यक्ष सौ. रुपालीताई परदेशी, जुन्नर विधानसभा संघटक संदीपभाऊ ताजणे, शहरप्रमुख शैलेशजी बनकर, महानगर समन्वयक शिवदर्शन खत्री यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, महिला आघाडी, युवा सेना व विविध अंगीकृत संघटनांचे कार्यकर्ते तसेच साईनाथ डोके, जालिंदर रासकर, बाळासाहेब मंडलिक, संजय घोणे, माजी नगरसेवक अविन फुलपगार, अमोल बनकर, सलीम मुलानी, मुकेश जाधव, बाळासाहेब सदाकाळ, महेश शेटे, दिनेश ताजणे, आशीर्वाद गाडेकर, मयूर मेहेर, अक्षय कुठे, शिवानंद ढेकणे, यश लोखंडे, प्रितेश लोखंडे, प्रसाद बनकर, आर्यन पवार, वैभव चौगुले तसेच महिला आघाडीच्या माजी नगरसेविका सुवर्णाताई बनकर, ज्योत्सनाताई महाबरे, नेत्राली ताजणे, गौरीताई शेटे, ज्योतीताई परहाड, रूपालीताई जाधव आदींसह मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत मिळाली असून बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचा परिचयही विद्यार्थ्यांना करून देण्यात आला.

# धनकवडीतील तो धोकादायक खड्डा कधी दुरुस्त होणार?

## मोठ्या अपघातानंतरच प्रशासन जागे होणार ? जेष्ठ जनसेविका श्रीमती वर्षाताई नाईक यांचा प्रशासनाला संतप्त सवाल

पुणे (दै. संध्या)





पुणे शहरातील धनकवडी परिसरात के. के. मार्केट समोर ओढ्यालगत पानपट्टीजवळ असलेला सुमारे दहा फूट खोल धोकादायक खड्डा नागरिकांच्या जीवावर बेतण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तो धोकादायक खड्डा कधी दुरुस्त होणार? कि मोठ्या अपघातानंतरच प्रशासन जागे होणार ? या गंभीर समस्येकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा गंभीर आरोप करत जेष्ठ जनसेविका श्रीमती वर्षाताई नाईक यांनी संबंधित विभागाला जाब विचारला आहे.

धनकवडी परिसर हा नेहमीच रहदारीने गजबजलेला असून या मार्गावरून शालेय विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला तसेच दुचाकी व चारचाकी वाहनधारकांची मोठ्या प्रमाणात ये-जा असते. अशा ठिकाणी ओढ्यालगत निर्माण झालेला हा खोल खड्डा नागरिकांसाठी गंभीर धोका ठरत आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी अपुऱ्या प्रकाशामुळे एखादा नागरिक किंवा वाहनचालक खड्ड्यात पडून मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.आता पावसाळा सुरु होईल तेव्हा मोठा पाऊस झाला तर पावसाचे पाणी तो खड्डा असलेल्या रस्त्यावर गुडघ्या इतके असते त्यामुळे तो खड्डा व त्या खड्ड्यावर ठेवलेली जाळी देखील दिसणार नाही. त्यामुळे या ठिकाणी भीषण अपघात घडू शकतो

याबाबत संताप व्यक्त करताना श्रीमती वर्षाताई नाईक म्हणाल्या की, "नागरिकांच्या सुरक्षेची जबाबदारी प्रशासनाची आहे. हा खड्डा अनेक दिवसांपासून तसाच उघडा असून अद्याप कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. एखादा मोठा अपघात किंवा जीवितहानी झाल्यानंतरच संबंधित विभागाला जाग येणार का?" असा संतप्त सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.

स्थानिक नागरिकांनीही वारंवार तक्रारी करूनही कोणतीही दखल घेतली जात नसल्याची खंत व्यक्त केली आहे. नागरिकांच्या म्हणण्यानुसार,याच खड्ड्यावर लोखंडी जाळी टाकण्यात आली असून त्यावर एक बहुदा सिमेंटचे बुजगावणे उभे केले आहे. या खड्ड्या नजीक कुठलाही सूचना फलक किंवा प्रतिबंधक व्यवस्था नसल्याने धोका अधिक वाढला आहे. श्रीमती वर्षाताई नाईक यांनी पुणे महानगरपालिका व संबंधित विभागाने तातडीने या ठिकाणी पाहणी करून खड्डा बुजवावा, त्यावर योग्य ती सुरक्षेची मजबीत साधने बसवावीत आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे. धनकवडीतील नागरिकांमध्ये सध्या एकच प्रश्न चर्चिला जात आहे तो म्हणजे या ठिकाणी "मोठा अपघात झाल्यानंतरच प्रशासन जागे होणार का, की त्याआधीच या धोकादायक खड्ड्याची दुरुस्ती होणार?"

## श्री केदारेश्वर विद्यालयात श्रमदानातून परसबागेची निर्मिती

काळदरी (दै. संध्या)

काळदरी येथील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सासवड संचलित श्री केदारेश्वर विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, काळदरी येथे आज शुक्रवार दि १९/०६/२०२६ रोजी युनायटेड वे मुंबई यांचे वतीने उन्नती प्रकल्प अंतर्गत आपल्या श्री केदारेश्वर विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, काळदरी येथे परसबाग निर्मिती करण्यात आली.

"करा श्रमदान, मिळेल समाधान या म्हणीनुसार जॉन डियर कंपनी मुंबई यांचे कार्यालयातील अनेक अधिका-यांनी स्वयंसेवक होऊन श्रमदान केले व त्यातून एक सुंदर परसबाग निर्माण केली. यासाठी सर्वांनी माती टाकणे, माती एकसमान करणे, वाफे तयार करणे, बिया व रोपांची लागवड करणे व रोपांना पाणी घालणे यांसारखी कामे अतिशय आनंदाने केली. यावेळी युनायटेड वे मुंबई अर्थसहाय्य जॉन डियर कं. यांचे प्रकल्प अधिकारी उपस्थित होते.

यावेळी ओंकार कुलकर्णी, राजेश एदलाबादकर, अनिल रावळ, ईश्वरी ढमढेरे आणि त्यांचे सहकारी उपस्थित होते. या प्रकल्पाचे खरे शिल्पकार असलेले सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि थोर देणगीदार यांचे विशेष कौतुक करण्यात येत आहे.

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सासवड या संस्थेचे अध्यक्षा आनंदीकाकी जगताप, संस्थेचे सचिव तथा माजी आमदार संजयजी चंदूकाका जगताप, भारतीय प्रशासन सेवा अधिकारी व संस्थेचे विशेष सल्लागार डॉ. राजेंद्रबापू जगताप, संस्थेचे संस्थापक-सचिव - विश्वस्त- प्रा. सीए. डॉ. एम एस जाधव (सर), संस्थेच्या समन्वयिका सोनालीताई शिंदे, सहसचिव दत्तात्रय गवळी,व्यवस्थापक कानिफनाथ अमराळे यांनी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे आणि देणगीदारांचे अभिनंदन केले

या प्रकल्पासाठी समन्वयक सौ पुजा चिव्हे यांनी मेहनत घेतली. संपूर्ण टिमचे स्वागत व सन्मान प्राचार्य पांडुरंग दुर्गाडे यांनी केले यावेळी प्रा संतोष नवले, संजय भिंताडे, पंडित चेंडके, बाळू पोमणे, पांडुरंग जाधव, अशोक भगत, संतोष दोडके,सौ कविता शेलार आदी उपस्थित होते.

## गांजा जवळ बाळगणाऱ्या दोघांना अटक

चाकण (दै. संध्या)

चाकण लगतच्या खराबवाडी गावच्या हद्दीत अंमली पदार्था विरोधी पथकाने केलेल्या कारवाईत ३ किलो ४२० ग्रॅम वजनाच्या गांजासह दोन युवकांना अटक केली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, खराबवाडी गावच्या हद्दीत सारा सिटीच्या पुढे जगदंब हॉटेल जवळील रस्त्यावर बुधवारी ही कारवाई करण्यात आली. याप्रकरणी पोलीस शिपाई राजेश वसंत गिरी यांनी महाळुंगे इंगळे एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. मनोज जगदीश पांजगे (वय २१, सध्या रा. खराबवाडी, ता. खेड, मूळ रा. वाघोडा, पो. वैध्यस, ता. वडगाव मंठा, जि. जालना) याला अटक करण्यात आली. तसेच रईस सरवर तडवी (वय २५, रा. खराबवाडी, ता. खेड) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

मनोज पांजगे याच्या ताब्यातून पोलिसांनी १ लाख ७१ हजार रुपये किमतीचा ३ किलो ४२० ग्रॅम वजनाचा गांजा जप्त केला. चौकशी दरम्यान हा गांजा आरोपी रईस तडवी याच्याकडून घेतल्याची माहिती पांजगे याने पोलिसांना दिली.

# विद्युत मार्गावर डिझेलचा प्रवास कशासाठी? पुणे–कोल्हापूर मार्गावर मेमू गाड्यांची मागणी

## विद्युतीकरण पूर्ण होऊनही जुन्या डेमू गाड्यांमुळे प्रवाशांचा खोळंबा; बिघाड, विलंब आणि गैरसोयींमुळे नाराजी

नीरा (दै. संध्या)

पुणे–सातारा–मिरज–कोल्हापूर रेल्वे मार्गाचे विद्युतीकरण आणि दुहेरीकरण पूर्ण होऊन आधुनिक रेल्वे वाहतुकीचा मार्ग मोकळा झाला असला, तरी या मार्गावरील अनेक पॅसेंजर गाड्या अद्यापही डिझेलवर धावत असल्याने प्रवाशांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. जुन्या डेमू गाड्यांमधील वारंवार होणारे तांत्रिक बिघाड, विलंब आणि देखभालीच्या समस्या यामुळे दैनंदिन प्रवाशांचा त्रास वाढला असून, या गाड्यांच्या जागी आधुनिक मेमू गाड्या सुरू करण्याची मागणी आता अधिक तीव्र झाली आहे. सध्या पुणे–कोल्हापूर, पुणे–मिरज तसेच सातारा–पुणे या मार्गांवर डेमू पॅसेंजर गाड्या धावत आहेत. मात्र, या गाड्यांच्या इंजिनांमध्ये वारंवार बिघाड होत असल्याने अनेकदा गाड्या उशिराने धावतात किंवा मधेच थांबतात. परिणामी विद्यार्थी, नोकरदार, व्यापारी आणि सर्वसामान्य प्रवाशांचा वेळ वाया जात असून त्यांना मानसिक त्रासालाही सामोरे जावे लागत आहे.



रेल्वेच्या इंधन बचत आणि पर्यावरणपूरक वाहतुकीच्या धोरणानुसार विद्युतीकरण झालेल्या मार्गांवर मेमू गाड्या अधिक परिणामकारक ठरू शकतात. विद्युत ऊर्जेवर चालणाऱ्या या गाड्यांचा वेग तुलनेने अधिक असून देखभाल खर्च कमी आणि कार्यक्षमता जास्त असल्याचे रेल्वे तज्ज्ञ सांगतात. त्यामुळे प्रवासाचा कालावधी कमी होण्यासोबतच इंधन खर्चात बचत आणि कार्बन उत्सर्जनातही मोठी घट होऊ शकते.

मिरज–पुणे मार्गाचे विद्युतीकरण आणि दुहेरीकरण पूर्ण झाल्यानंतर या मार्गावरील बहुतांश एक्स्प्रेस गाड्या आता विद्युत इंजिनावर धावत आहेत. मात्र, पॅसेंजर सेवांसाठी अजूनही डिझेल डेमू गाड्यांवर अवलंबून राहावे लागत असल्याने "विद्युत मार्गावर डिझेल गाड्या का?" असा सवाल प्रवाशांकडून उपस्थित केला जात आहे. रेल्वे प्रशासनाकडून उपलब्ध रेक, देखभाल सुविधा, प्रवासी संख्या आणि परिचालनाच्या गरजा लक्षात घेऊन काही मार्गांवर डेमू गाड्यांचा वापर सुरू असल्याचे सांगितले जात असले, तरी पुणे, सातारा, मिरज आणि कोल्हापूर या महत्त्वाच्या स्थानकांना आधुनिक मेमू सेवा उपलब्ध करून देण्याची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे.

कोल्हापूर–मिरज–सातारा–पुणे या महत्त्वाच्या प्रवासी मार्गावरील डेमू गाड्यांचे मेमूमध्ये रूपांतर करण्याची मागणी रेल्वे प्रशासनाकडे अनेक वेळा करण्यात आली आहे. मात्र, या मागणीकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप रेल्वे सल्लागार समितीचे सदस्य सुकुमार पाटील यांनी केला आहे. प्रवाशांच्या वाढत्या गरजा आणि आधुनिक रेल्वे सेवांची आवश्यकता लक्षात घेता या मार्गावर मेमू सेवा सुरू करण्याचा निर्णय तातडीने घेण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

मुंबई आणि पुणे परिसरात अत्याधुनिक मेमू गाड्या यशस्वीपणे धावत असताना पुणे विभागातील जुन्या डेमू गाड्या मिरज आणि कोल्हापूरकडे वळवण्यात आल्याची भावना प्रवाशांमध्ये आहे. वारंवार बिघाड होणाऱ्या आणि वेळापत्रक कोलमडवणाऱ्या या गाड्यांऐवजी आधुनिक व वेगवान मेमू सेवा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी प्रवासी संघटना सातत्याने करत आहेत.

# ‘वारसाहक्का’ने नव्हे तर.. संघर्षातून उभे रहात आहे राहूल गांधींचे नेतृत्व - काँग्रेस नेते गोपाळदादा तिवारी

पुणे (दै. संध्या)



राजेशाही-निज़ामशाही-मोघल साम्राज्यात विभागलेला भारत, ब्रिटिशांच्या गुलामगिरीत खितपत होता. मात्र महात्मा गांधी, नेहरू, पटेल, आझाद, भगतसिंह - राजगुरूसह काँग्रेस नेत्यांच्या व हजारो स्वातंत्र्य सैनिकांच्या त्याग, बलिदान व दीर्घ संघर्षातून स्वातंत्र्योत्तर ‘प्रजासत्ताक भारत’ उभारल्याचे श्रेय निर्विवादपणे काँग्रेस’लाच जात असल्याचे प्रतिपादन काँग्रेस नेते व राज्याचे वरिष्ठ प्रवक्ते गोपाळदादा तिवारी यांनी केले.

महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस व राज्य एनएसयुआय च्या आजी - माजी पदाधिकारी ऋत्विक धनवट, अक्षय कांबळे व सहकारी यांनी ‘काँग्रेस नेते व संसदीय विरोधी पक्ष नेते मा राहूल गांधी’ यांचे जन्मदिनाचे औचित्य साधून, राहुल’जीं च्या जीवनातील विविध घटकांची व्यथा जाणून घेण्याचा त्यांच्या प्रयत्नांचा व त्यांच्या व्यक्तिमत्वाच्या विविध पैलूंबाबतची माहिती दर्शवणारे छायाचित्र प्रदर्शनाचे समारोप प्रसंगी ते बोलत होते.

सदर प्रदर्शनाचे उद्‌घाटन जेष्ठ नेते उल्हासदादा पवार, मोहन जोशी, पुणे शहराध्यक्ष प्रशांत जगताप व दिप्ती चवधरी यांचे उपस्थितीत झाले. सदरचे छायाचित्र प्रदर्शन बाळासाहेब ठाकरे कलादालन येथे आयोजित करण्यात आले होते.

समोरोप प्रसंगी बोलतांना, गोपाळदादा पुढे म्हणाले की, देशाच्या उभारणीतील योगदान व उत्तरदायीत्वाचे भान ठेवून ‘गांधी - नेहरू’ कुटुंबातील नेत्यांनी, ‘बापूं’च्या लोककल्याणकारी राज्याची संकल्पना रुजवली व संविधानीक लोकशाही व्यवस्था मजबूत करत देशात राष्ट्रीय संपत्तीचे जाळे निर्माण केले.

देशाच्या एकात्मतेसाठी, राजधर्माच्या कर्तव्य भावनेतून अपेक्षित योगदान व बलिदान दिले, यातूनच नेहरू -गांधी कुटुंबियांचे निःस्वार्थी नेतृत्व, देशात परीस्थिती प्रमाणे प्रस्थापित झाले. देशाप्रती उत्तरदायित्वाच्या भावनेतून, वारसा हक्काने नव्हे तर.. प्रतिकूल परिस्थितीतुनही संघर्षातून काँग्रेस नेते राहूल जी गांधींचे नेतृत्व उभे रहात असल्याचा व त्यावर (२०२४ लोकसभेत, कांग्रेसच्या दुप्पट जागा वाढून) जनतेचे समर्थन मिळत असल्याचे, उचित समाधान काँग्रेसजनांस असल्याचे प्रतिपादन काँग्रेस नेते व राज्याचे वरिष्ठ प्रवक्ते गोपाळदादा तिवारी यांनी केले.

संकुचित स्वहिता’पेक्षा व्यापक राष्ट्रहित जोपासण्याचा डीएनए’ राहुल गांधीं मध्ये अवतरल्यानेच, ६० वर्षांच्या देशाच्या प्रगतीच्या व पुण्याईच्या कर्म संचित पाठबळावर, देशवासियांचा आशिर्वाद व प्रेमाच्या शक्तीवर राहुलजी गांधी यांनी देशाचा चतुष्कोण साधणारी सु १२,००० किमी चीं पदयात्रा थंडी -उन - पावसाची तमा न बाळगता केली, या देशप्रेमापोटी केलेल्या कर्म संचित वाटचालीचे श्रेय देश-हितामध्ये बदलून, नियती राहुलजींना संधी दिल्यावाचून राहणार नसल्याचे ही गोपाळदादा तिवारी यांनी सांगितले.

“६० वर्षांच्या सत्य, वास्तविकतेच्या व कर्तव्यशील नैतिकतेच्या देश साक्षी असलेल्या कर्म संचित पुण्याई’वर;

१२ वर्षांच्या केवळ स्वहीत साधणारी, सत्ताधीशांची अनैतिक कारकिर्द’ हावी ठरणार नसल्याचा आत्मविश्वास ही गोपाळदादा तिवारी यांनी दर्शवला.

